बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड, मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर.... या जिल्ह्यात एकाचवेळी प्रकाशित होणारे

नोव्हेंबर / November
सोमवार / Monday
दि. २१ / Dt: 21
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com मुख्य संपादक : बालासाहेब कडबाने 9423912525 निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061 www.jagmitra.com

बीड/Beed • वर्ष १७ वे/Year 17 • अंक ३१ /Issue 31 • आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीडमध्ये सरकारी जमिनीवर 'दीड कोटींचा' दरोडा?

गायरान जमिनीचे बनावट मूल्यांकन दाखवून मल्टीस्टेट आणि लिमिटेड बँकांकडून लाटले दीड कोटी!

'वर्ग-२' च्या जमिनीचा 'खालसा' नेमका कोणत्या अधिकाऱ्याच्या सहीने झाला? सखोल चौकशीची मागणी

जिल्हाधिकारी आणि तहसीलदार या महाघोटाळ्याची दखल घेऊन भूमाफियांच्या मुसक्या आवळणार का?

गायरान जमीन कर्ज घोटाळ्याचे सर्व पुरावे हाती; पुढील अंकात होणार पुराव्यानिशी पोलखोल!

बीड/जगमित्र न्यूज

बीड तालुक्यात कायद्याचे राज्य सुरू आहे की भूमाफियांचे साम्राज्य, असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सरकारी गायरान जमिनीचा बोगस 'खालसा' करून, त्यावर तब्बल १ कोटी ४८ लाख रुपयांचे कर्ज उचलण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कागदावर खालसा, कागदावर खरेदीखत आणि बनावट मूल्यांकनाच्या आधारे मल्टीस्टेट बँक आणि क्सिस लिमिटेड बँक अशा दोन वेगवेगळ्या बँकांकडून खणखणीत दीड कोटी रुपये लाटण्यात आले आहेत. हा केवळ आर्थिक घोटाळा नसून, सरकारी मालमत्ता आणि जनतेच्या पैशांवर टाकलेला हा नियोजित दरोडा आहे. बीड तालुक्यातील ग्रामीण भागात असलेली १ हेक्टर ४० आर सरकारी गायरान जमीन कायद्याने 'वर्ग-२' (भोगवटादार वर्ग-२) च्या मालकीची आहे. प्रचलित नियमानुसार अशी जमीन विकता येत नाही, हस्तांतरित करता येत नाही किंवा ती बँकेकडे गहाणही ठेवता येत नाही. मात्र, कायद्याची पायमल्ली करत या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर बेकायदेशीररीत्या दोन व्यक्तींची नावे चढवण्यात आली आणि दोन स्वतंत्र कागदपत्रे तयार करून लुटीचा हा खेळ रचला गेला. यामध्ये अवघ्या ४० आर जमिनीवर ५० लाख रुपयांचे, तर उरलेल्या १ हेक्टर जमिनीवर तब्बल ९८ लाख रुपयांचे कर्ज उचलण्यात आले आहे. प्रत्यक्षात ही जमीन मुरमाड आणि ओसाड असून, तिची बाजारभावाने किंमत नगण्य आहे. असे असताना या जमिनीला सोन्याचा भाव देऊन दीड कोटींचे कर्ज मंजूर करणारा तो 'महान' व्हॅल्युअर कोण? बँकेच्या अधिकाऱ्यांनी जागेची प्रत्यक्ष पाहणी न करताच डोळे झाकून कोट्यवधींची खिरापत वाटली की या लुटीत बँक अधिकारीच भागीदार आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, वर्ग-२ च्या सरकारी जमिनीचा खालसा झालाच कसा? तहसील कार्यालयातील कोणत्या टेबलावर ही फाईल फिरली आणि कोणत्या अधिकाऱ्याच्या पेनने ही सरकारी जमीन 'खासगी' करण्यात आली? सातबारा बदलणे, फेरफार मंजूर करणे आणि खरेदीखताला परवानगी देणे हे एकाकी भूमाफियाचे काम नाही. यामागे महसूल विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची मोठी साखळी कार्यरत असून, सही करणाऱ्यापासून ते शिक्का मारणाऱ्यापर्यंत सर्वच या दीड कोटींच्या वाटणीत सामील असल्याचा दाट संशय नागरिक व्यक्त करत आहेत.



पुढील अंकात पुराव्यानिशी पोलखोल!

या महाघोटाळ्याचे ठोस पुरावे आणि कागदपत्रे आमच्या हाती लागली आहेत. या लुटीतील नेमके लाभार्थी कोण? फाईलवर सही करणारा तो अधिकारी कोण? कोणत्या बँकांनी हा प्रताप केला आणि ते बनावट मूल्यांकन कोणी केले? या सर्वांचा नावानिशी आणि पुराव्यानिशी पर्दाफाश पुढील अंकात केला जाणार आहे!

जिल्हाधिकारी आणि तहसीलदार साहेब, आतातरी डोळे उघडा!

बीडमध्ये सरकारी गायरान जमिनी लुटल्या जात आहेत, त्या गहाण ठेवून बँकांचे कोट्यवधी रुपये लाटले जात आहेत आणि दुसरीकडे जबाबदार प्रशासन मात्र डोळ्यांवर गांधारीची पट्टी बांधून गप्प बसले आहे. जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांनी या प्रकरणाची केवळ 'दखल घेतली' असे म्हणून चालणार नाही. प्रशासनाने तातडीने पावले उचलत या प्रकरणाची सर्व मूळ कागदपत्रे जप्त करावीत, संबंधित जमिनीचे सातबारा उतारे गोठवावेत आणि बँकेची कर्ज प्रकरणे सील करावीत. यातील दोषी भूमाफियांसह त्यांना पाठीशी घालणाऱ्या भ्रष्ट अधिकारी आणि बँक कर्मचाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना गजाआड करावे, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा, येत्या काळात बीड तालुक्यात एकही इंच सरकारी जमीन शिल्लक राहणार नाही.

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी देशमुख परिवाराची भेट घेऊन व्यक्त केले सांत्वन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ येथील ज्येष्ठ व आदरणीय व्यक्तिमत्त्व भाऊसाहेब उर्फ विठ्ठलराव नरहरराव देशमुख यांच्या दुःखद निधनानंतर माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी देशमुख परिवाराची भेट घेऊन सांत्वन व्यक्त केले. यावेळी त्यांनी राजेश देशमुख, डॉ. यशवंत देशमुख यांच्यासह कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला. भाऊसाहेब यांच्या निधनाने देशमुख परिवारावर कोसळलेल्या दुःखाबद्दल त्यांनी संवेदना व्यक्त केल्या.



भाऊसाहेब उर्फ बप्पा देशमुख हे प्रेमळ, मनमिळाऊ आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने परिवाराची मोठी हानी झाली असून त्यांच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील. या दुःखद प्रसंगी धनंजय मुंडे साहेब यांनी देशमुख परिवाराला दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी भावना व्यक्त करत दिवंगत भाऊसाहेब यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

दहा वर्षांची घाण उपसण्यासाठी नाला उखडला

जालना महापालिकेच्या स्वच्छतेचा बुरखा फाटला!

जालना । मकरंद जहागीरदार

पाच वर्षांपूर्वी स्वच्छ भारत अभियान स्पर्धेत राज्यात सहाव्या आणि देशात तेवीसाव्या क्रमांकावर गौरविल्या गेलेल्या जालना पालिकेच्या महापालिकेच्या एका नाल्यातील घाण गेल्या दहा वर्षांपासून तुंबल्याने संपूर्ण नाली खोदून काढावी लागली आहे. जुन्या जालन्यातील टाऊन हॉल परिसरातील नाली वजा नाल्याच्या खोदकामानंतर शेकडो ॅक्टर गाळ आणि घाण उपसून काढावी लागली आहे. विशेष म्हणजे या ऐतिहासिक आणि तेवढ्याच खळबळजनक कामासंदर्भात महापालिकेच्या



बांधकाम विभागासह स्वच्छता विभागाचे देखील संबंधित अभियंते - अधिकारी चक्क अनभिज्ञ असल्याचे समोर आले आहेत.

या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की जुन्या जालन्यातील टाऊन हॉल जवळील दीपक हॉस्पिटल ते भगवंतराव गाढे पुतळ्यापर्यंतच्या जुन्या नालीचे खोदकाम दहा बारा दिवसांपूर्वी अचानक सुरू करण्यात आले. नाली पूर्णपणे चोकअप झाल्याने आणि दुसऱ्या बाजूने पाणी बाहेर पडणे बंद झाल्याने नालीतील घाण आणि सांडपाणी वारंवार रस्त्यावरून वाहू लागले. त्यामुळे त्या परिसरातील रहिवाशांनी महापालिकेसह संबंधित नगरसेवक आणि अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्याच्या पार्श्वभूमीवर त्या भागातील नगरसेवकांनी महापालिकेच्या अधिकारी अभियंत्यांशी चर्चा करून ती नाली खोदण्यास सुरूवात केली. जेसीबी सारख्या यंत्राने ती नाली वजा नाला खोदून गाळ काढण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्याने अखेरीस काही

पान २ वर

विधान भवनाचे सहसचिव नागनाथ थिटे यांनी सपत्नीक घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



महाराष्ट्र विधान भवनाचे सहसचिव नागनाथ थिटे यांनी आज सकाळी ७ वाजता सपत्नीक ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी प्रभू वैद्यनाथाच्या चरणी नतमस्तक होत पूजा-अर्चना व अभिषेक केला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनाने थिटे दाम्पत्याला अत्यंत प्रसन्न वाटले. मंदिरातील आध्यात्मिक वातावरण, धार्मिक विधी आणि प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनाने त्यांना विशेष आनंदाची अनुभूती मिळाली.

यावेळी मंदिर प्रशासनाच्या वतीने तसेच माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्या वतीने नागनाथ थिटे यांचे शौल व बुके देऊन स्वागत करण्यात आले. मंदिर प्रशासनाच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. परळी येथील श्री क्षेत्र वैद्यनाथ ज्योतिर्लिंग हे देशातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असून, देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या पवित्र तीर्थक्षेत्रात प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन थिटे दाम्पत्याने भक्तिभावाने पूजा-अर्चना केली.

विहिरीत पडलेला मोबाईल काढताना शेतकरी जखमी

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील लाडेवडगाव येथे विहिरीत पडलेला मोबाईल काढून, दोरीला धरून वर येताना विहिरीत पडून शेतकरी जखमी झाल्याची घटना घडली आहे.

लाडेवडगाव येथील शेतकरी रतन रामराव घुगे (वय ६०) हे गुरुवारी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास विहिरीतील पाणी पातळी डोकावून पाहत असताना त्यांच्या शर्टच्या खिशातील मोबाईल विहिरीत पडला. तो मोबाईल काढण्यासाठी ते विहिरीत उतरले होते. मोबाईल घेऊन ते दोरीला धरून विहिरी बाहेर येत असताना तोल सुटल्याने ते विहिरीत पडले.

पान २ वर

पोलिसांना गुटख्याची माहिती दिल्याच्या संशया वरून गुटखा माफियाची घरात घुसून पती-पत्नीला मारहाण

केज । प्रतिनिधी

आमच्या अवैध्य गुटखा विक्रीची माहिती पोलिसांना दिल्या मुळे त्यांनी धाड टाकली असल्याच्या संशया वरून अवैद्य गुटखा विक्री करणाऱ्या गुटखा माफियांनी भरदिवसा घरात घुसून एका कुटुंबातील नवरा बायकोला लोखंडी पाईपने मारहाण करून दहशत निर्माण केली आहे.

दि. १८ नोव्हेंबर रोजी केज शहरातील प्रशांत नगर केज ता केज जि बीड येथे दुपारी १२:३० च्या सुमारास अवैद्य गुटखा विक्री करीत असलेल्या, सागर बाजीराव चाळक, आकाश बाजीराव चाळक, कृष्णा बबन चाळक आणि एक अनोळखी इसम (सर्व रा. प्रशांत नगर केज) यांनी त्यांच्या अवैद्य व चोरट्या गुटखा विक्रीची माहिती पोलिसांना दिल्याच्या संशया वरून सुरेश कन्नमवार यांच्या घरात घुसून लोखंडी पाईप व दगडाने मारहाण केली. सागर चाळक हा सुरेश कन्नमवार यांना म्हणाला की, हरामखोरा तु पोलीसांना मी गुटखा विकतो, याची माहीती देवुन माझ्यावर कार्यवाही करायला का लावलीस ? मारा रे याला आणि याची मस्ती जिरवा. असे म्हणुन त्याने हातातील लोखंडी पाईपने सुरेश कन्नमवार यांना मारहाण केली. तर आकाश बाजीराव चाळक, कृष्णा बबन चाळक आणि एक अनोळखी यांनी त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून त्यांची पत्नी दैवशाला कन्नमवार व सुरेश कन्नमवार या दोघा नवरा बायकोला बहिनीवर लाथा-बुक्क्यानी व दगडाने मारहाण केली.

या प्रकरणी दैवशाला कन्नमवार यांच्या फिर्यादी वरून केज पोलिस ठाण्यात सागर बाजीराव चाळक, आकाश बाजीराव चाळक, कृष्णा बबन चाळक आणि एक अनोळखी इसम या चौघा विरुद्ध गु. र. नं. ७२१/२०२६ भा. न्या. सं. ११५(२), ११८(१), ३३३, ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल बजरंग मुंडे करीत आहेत.

दरम्यान, केज पोलिसांच्या डीबी पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, पोलिस हेडकॉन्स्टेबल संगीता हनवते, पोलिस कॉस्टेबल नितीन वारे यांनी दि. १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास प्रशांत नगर, केज येथील सागर बाजीराव चाळक याच्या घराच्या

पान २ वर

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पदपूजन सोहळ्याचे २४ नोव्हेंबर रोजी आयोजन

ज्येष्ठ नेते मनोज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व शिवसैनिकांची उपस्थिती

मुंबई । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या पदपूजन सोहळ्याचे आयोजन मंगळवार, दि.२४ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबई साईबाबा मंदिर, श्रीनगर, ठाणे येथे करण्यात आले आहे.

हा पदपूजन सोहळा अण्णासाहेब जाधव यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. ज्येष्ठ नेते मनोज शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सोहळ्यास जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुलुक, ज्येष्ठ नेत्या डॉ. प्रतिभा थोरात तसेच तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

पोलिसांची वाळूमाफियांवर धडाकेबाज कारवाई, दोन टिप्पर, ट्रॅक्टर लोडरसह लाखोंचा मुद्देमाल जप्त!

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले असून, आता वाळूमाफियांना पोलिसांनी जोरदार दणका दिला आहे. पोलीस निरीक्षक विजय रामोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक देवकते यांनी छत्रबोरगाव येथील गोदावरी नदीपात्रात धडाकेबाज कारवाई करत तब्बल ५१ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांच्या टोळक्यात एकच खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मौजेछत्रबोरगाव येथील गोदावरी नदीपात्रातून विनापरवाना गौण खनिज वाळूचा उपसा करून त्याची चोरटी विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक विजय रामोड यांना मिळाली होती. माहिती मिळताच त्यांनी पोलीस उपनिरीक्षक देवकते यांच्यासह पोलीस पथकाला तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेत छापा मारला असता, तेथे वाळू उपसा आणि वाहतुकीसाठी वापरली जाणारी दोन टिप्पर वाहने व एक महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर लोडर आढळून आला. पोलिसांनी एक पिवळ्या-राखाडी रंगाचा हायवा टिप्पर (किंमत ३६ लाख रुपये), त्यातील पाच ब्रास वाळू (किंमत ३० हजार रुपये), दोन ब्रास वाळू असलेला अशोक लेलँड टिप्पर (किंमत ८ लाख रुपये) आणि वाळू भरण्यासाठी वापरला जाणारा महिंद्रा ट्रॅक्टर लोडर (किंमत ७ लाख रुपये) असा एकूण ५१ लाख ३०

पान २ वर

पाडळसिंगी टोलनाक्यावर शेतकऱ्यांचा एल्गार!

हेक्टरी १ लाख रुपये मदत आणि उसाला ४५०० रुपये दरासाठी जोरदार आंदोलन

गेवराई । प्रतिनिधी

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत मिळावी आणि उसाला प्रतिटन ४ हजार ५०० रुपये दर मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी बीड जिल्ह्यातील गेवराईजवळील पाडळसिंगी टोलनाक्यावर शेतकऱ्यांचे जोरदार आंदोलन उभारण्यात आले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळीच्या विचारातून हे आंदोलन पार पडले.

सोशल मीडियाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे रविराज साबळे यांनी या आंदोलनाचे आयोजन केले होते. विशेष म्हणजे, राजू शेट्टी यांचे नाव आणि त्यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळीचा उल्लेख केल्याशिवाय आंदोलनाला सुरुवात करणार नाही, अशी भूमिका घेत रविराज साबळे यांनी या आंदोलनामागील संघटनेची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी आपल्या आक्रमक भाषणातून सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चांगलेच धारेवर



धरले.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीवर सरकारचे लक्ष वेधत शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत आणि उसाला साडेचार हजार रुपये प्रतिटन दर देण्याची ठाम मागणी केली. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सरकारच्या धोरणांचा जोरदार समाचार घेतला. मराठवाड्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, शेतीसमोरील संकटे आणि शासनाच्या मदतीची गरज त्यांनी आपल्या परखड मांडणीतून अधोरेखित केली. या आंदोलनात प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेले विवेकानंद पाटील यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वशैलीतून शेतकऱ्यांच्या व्यथा आणि वास्तव मांडले. त्यांच्या भाषणाला उपस्थित शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांच्या प्रत्येक मुद्द्याला शेतकऱ्यांकडून मिळणारा प्रतिसाद आंदोलनातील वातावरण अधिकच उत्साहपूर्ण करत होता.

रविराज साबळे यांचे आंदोलनाचे नियोजन,

पान २ वर

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — सोमवार दि.२३ नोव्हेंबर २०२६ — पान नं.२

'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेअंतर्गत' विशेष पशुसंवर्धन प्रशिक्षण कार्यशाळेचा जास्तीत जास्त शेतकरी व युवकांनी लाभ घ्यावा : अमोल खरात

जालना । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकरी, पशुपालक आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील आधुनिक व्यावसायिक संधींची सविस्तर माहिती देण्यासाठी स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियान व युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ५ दिवसीय 'विशेष पशुसंवर्धन प्रशिक्षण कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बंधू, पशुपालक आणि युवकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्सचे संचालक अमोल खरात यांनी केले आहे.

प्रशिक्षण कार्यशाळेची प्रमुख वैशिष्ट्ये: शासकीय योजना मार्गदर्शन: 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजनेचे' निकष, शासकीय अनुदान व ऑनलाइन अर्ज प्रक्रियेची सविस्तर माहिती. आधुनिक पशुपालन व व्यवस्थापन: दुग्ध व्यवसाय (गाय व म्हैस पालन), शेळी-मेंढी पालन आणि कुक्कुटपालन व्यवसायातील उत्पादन व नफा वाढवण्याचे आधुनिक तंत्रज्ञान. स्वयंरोजगार व उद्योजकता: ग्रामीण भागातील युवकांसाठी शाश्वत शेतीपूरक व्यवसाय उभारणी आणि आर्थिक सक्षमीकरणाचे मार्गदर्शन.

कार्यशाळेचा तपशील खालीलप्रमाणे आहे: प्रशिक्षण कालावधी: ५ दिवस दिनांक: २२ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०२६ वेळ: सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत ठिकाण: युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्स, शॉप क्र. ३, कृष्णा प्लाझा, रेल्वे स्टेशन रोड, जालना - ४३१२०३ नावनोंदणी शुल्क: केवळ १००/- (मर्यादित प्रवेश असल्याने पूर्वनोंदणी आवश्यक) तरी जिल्ह्यातील इच्छुक शेतकरी, पशुपालक आणि युवकांनी आपली नावे लवकरात लवकर नोंदवावीत. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी अमोल खरात (९०४९७१९८२६), मिलिंद सावंत (९७६३८६०२२१) किंवा अनुराधा मॅडम (८६२६०९६८२६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अमोल खरात (युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्स, जालना) यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

दुष्काळ हा मानवनिर्मित व मूर्ख राज्यकर्त्यांमुळेच

आनंदराज आंबेडकर यांची जालन्यात टीका

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील दुष्काळ हा मानवनिर्मित व मूर्ख राज्यकर्त्यांमुळेच निर्माण झाला असल्याची टीका रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी येथे केली. मराठवाड्यातील गायरान प्रश्नी जेलभरो आंदोलन करण्याची घोषणाही त्यांनी केली.

जालना शहरातील गोल्डी लॉन्सवर शनिवारी (दि.२१) आयोजित रिपब्लिकन सेनेच्या २८ व्या वर्धापनदिन सोहळ्यात ते बोलत होते. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखालील आयोजित या सोहळ्यास ड. अमन आंबेडकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सोहळ्यास राष्ट्रीय महासचिव संजिव बोंधनकर, केंद्रीय सदस्य प्रा. जगन्नाथ बाबा, प्रदेश उपाध्यक्ष यशवंत भालेराव, किरण घोंगडे, प्रदेश महासचिव विनोद काळे, प्रदेश प्रसिध्दी प्रमुख अविनाश शिंदे, प्रदेश सदस्य अरूण रामराजे, युसूब सय्यद, वाहतूक सेनेचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब वाहुळ, कामगार आघाडीचे अध्यक्ष शंकर माने, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रमेश उबाळे, विदर्भ अध्यक्ष प्रफुल्ल शेंडे, मराठवाडा निमंत्रक विजय साळवे, डॉ.ह.नि.सोनकांबळे आदींची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. विचारमंचावर मराठवाडा युवा अध्यक्ष दिनेश आदमाने, माजी जिल्हाध्यक्ष लिंबाजी वाहुळकर, सतिष वाहुळे, जितेंद्र उघडे, मच्छिंद्र खरात, आनंद म्हसके आदींची उपस्थिती होती.



यावेळी बोलतांना आनंदराज आंबेडकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्यात भरपूर पाऊस पडतो, मात्र पावसाचे पाणी साठवून ठेवले जात नाही, नियोजन केले जात नाही, मूर्ख राज्यकर्त्यांमुळेच दुष्काळ निर्माण होत आहे. राज्यकर्ते जोपर्यंत बदलणार नाही तोपर्यंत हा मानवनिर्मित दुष्काळ पडत जाणार आहे. दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारे सरकार अस्तित्वात नसल्याची टीका त्यांनी केली. भारतीय संविधान राबविणारे चांगले हात देशाला लाभले नसल्याची खंत आंबेडकर यांनी यावेळी व्यक्त केली. मराठवाड्यातील गायरानाचा प्रश्न मोठा आहे, सरकार या प्रश्नी गंभीर नाही, गायरान प्रश्नी रिपब्लिकन सेनेच्या वतीने लवकरच जेलभरो आंदोलन करण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. सरकार अंबानी व अदानी यांचे लाड पुरवत सर्वसामान्य माणूस, शेतकरी, कष्टकरी माणसाच्या हिताचा विचार करीत नसल्याची टीकाही त्यांनी केली. देशात गांधीवाद आला, मनूवाद आला, यापुढे आंबेडकरवाद येणार असल्याचा विश्वास व्यक्त करीत सरकारच्या धोरणावरही त्यांनी टीका केली.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना ड. अमन आंबेडकर यांनी तरुणांनी पुढाऱ्यांच्या पाठीमागे न धावता शिक्षणाची वाट धरुन स्वाभिमानाने जीवन जगावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करावे, असे आवाहन करतांना शासनाच्या धोरणावर टीका केली. यावेळी विजय मोरे, किरण घोंगडे, लक्ष्मण भगत, विनोद मोरे, डॉ.ह.नि.सोनकांबळे, के.व्ही. मोरे आदींनी मनोगत व्यक्त करतांना दुष्काळ निवारणासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, गायरानाचे प्रश्न निकाली काढावेत, अशी मागणीही केली.

अध्यक्षीय समारोप करताना प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांनी दुष्काळी परिस्थितीत आर्थिक विकास महामंडळ, बचत गट, मायक्रो फायनान्सची कर्ज सरसकट माफ न केल्यास तीव्र आंदोलन छेडून राज्य सरकारला सळो की पळो करून सोडण्याचा इशारा दिला. रिपब्लिकन सेनेचे संघटन मजबूत होत असून सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांचे हात बळकट करावे, असे आवाहनही केले. रिपब्लिकन सेनेचा वर्धापनदिन सोहळा सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झाला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

दुष्काळ निवारणासाठी तातडीने पाऊल उचलला रिपब्लिकन सेनेच्या वर्धापनदिनी गायरान जमिनी प्रत्यक्ष कसणाऱ्यांच नावे कराव्यात, महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीवर शासनाने तातडीने उपाय योजना कराव्यात, वेगाने होणारा पर्यावरणाचा -हास थांबवून त्यावर उपाय योजना कराव्यात, विविध आर्थिक विकास महामंडळातर्फे देण्यात आलेली बँकेची कर्जे तसेच मायक्रो फायन्सास कंपन्या व बचत गटांची कर्जे सरसकट माफ करण्यात यावी, असा ठराव यावेळी संमत करण्यात आला. रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी यांनी ठरावाचे वाचन केले.

स्वप्ने पूर्ण करण्यासाठी जिद्दीने उतरा : जिल्हाधिकारी अशीमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील २६५ गरजू विद्यार्थ्यांना ३५ लाखाची कलश शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आयुष्यात ध्येय आणि स्वप्ने मोठी असावीत. जोपर्यंत आपले लक्ष्य स्पष्ट नसते, तोपर्यंत मार्ग सापडत नाही. मनात जिद्द ठेवून आपण प्रामाणिक प्रयत्न सुरू केले की, कलर सीड्स आणि त्यांना एज्युकेशन फाउंडेशनप्रमाणे सहकार्य आणि मार्ग आपोआप मिळत जातात. जीवनात काय कमी आहे यावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा आपल्याकडे काय क्षमता व कौशल्य आहे, यावर विश्वास ठेवून मेहनत करा. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसून कठोर परिश्रमाला पर्याय नाही, असे सांगून कलश सीड्स व जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

आयुष्यात संकटे आणि आव्हाने येतच असतात. परंतु, जेवढे चॅलेंज तुम्ही फेस कराल, तेवढेच अधिक मजबूत बनाल. केवळ गुणवंत असून चालत नाही, तर जे हिंमत दाखवतात तेच पुढे जातात. आपण जे शिकतो, ऐकतो त्यावर प्रत्येकाला स्वतःचे मत मांडता व व्यक्त होता आले पाहिजे. चुकत असले तरी बोला, कारण चुकीचे बोलण्याचीही हिम्मत केली नाही तर माणूस आयुष्यात कधीच सुधारू शकत नाही, असा मौलिक व प्रेरणादायी सल्ला जळगाव येथील दीपस्तंभ फाउंडेशनचे संस्थापक यजुवेंद्र महाजन यांनी विद्यार्थ्यांना दिला.



रविवार दि. २२ नोव्हेंबर रोजी अग्रसेन फाउंडेशन येथे जालना एज्युकेशन फाउंडेशन संचलित कलश सीड्स शिष्यवृत्ती प्रदान सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी आर्थिक दुर्बल घटकातील २६५ विद्यार्थ्यांना ३५ लाख ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली, त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून यजुवेंद्र महाजन बोलत होते. अध्यक्षस्थानी कलश सीड्सचे चेअरमन सुरेश अग्रवाल हे होते तर या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हाधिकारी अशीमा मित्तल, ज्येष्ठ उद्योजक व समाजसेवी भाईश्री रमेशभाई पटेल, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अशोक बनकर हे उपस्थित होते. व्यासपीठावर सौ. रेखादेवी अग्रवाल, कलर सीड्सचे व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, संचालिका वर्षा अग्रवाल, जतन अग्रवाल, इशिता अग्रवाल-मालपाणी, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी आदी मान्यवर उपस्थित होते.

शैक्षणिक मार्ग सुकर करणारा स्तुत्य उपक्रम-रमेशभाई पटेल : समाजसेवी रमेशभाई पटेल यांनी विद्यार्थ्यांना हिमतीचा संदेश दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची आणि मदतीची नितांत गरज आहे, अशा वेळी सुरू असलेला जालना एज्युकेशन फाउंडेशन संचलित कलश शिष्यवृत्तीचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. पुढे जाण्यासाठी आणि ध्येय गाठण्यासाठी अपार हिंमत असावी लागते. विद्यार्थ्यांनी केवळ स्वप्ने न बघता ती पूर्ण करण्यासाठी आपली पूर्ण ताकद पणाला लावली पाहिजे. मनात जिद्द ठेवून प्रामाणिकपणे काम केले तर अडचणी दूर होतात आणि जग तुमच्या पाठीशी उभे राहते, असा सल्ला त्यांनी दिला.

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचा प्रयत्न-वर्षा अग्रवाल : कलश सीड्सच्या संचालिका वर्षा अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना सांगितले, ज्याप्रमाणे चांगल्या बियाण्याला योग्य माती, वातावरण आणि खत-पाण्याची गरज असते, तेव्हाच ते उत्तम प्रकारे बहरते; त्याचप्रमाणे गुणवंत विद्यार्थ्यांना योग्य वेळी थोडे सहकार्य आणि संधी मिळाली तर ते उज्ज्वल भविष्य घडवू शकतात. यंदा जालना जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील १७९ गावांमधून २६५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून यात १३३ मुली आणि १३२ मुले आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च पेलणे कुटुंबांसाठी कठीण असते, अशा वेळी ही शिष्यवृत्ती त्यांच्या पाठीशी उभी राहत आहे. विद्यार्थ्यांनी आलेल्या अडचणींवर मात करून जिद्दीने शिक्षण पूर्ण करावे आणि उद्या स्वतःच्या पायावर उभे राहून समाजातील इतर गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्यावा.

सहा वर्षात १कोटी ७८ लाखाची शिष्यवृत्ती प्रदान-प्रा. सुरेश लाहोटी : जालना एज्युकेशन फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांनी प्रास्ताविकात शिष्यवृत्ती उपक्रमाची माहिती दिली. शेतकरी कुटुंबातील आणि आर्थिक अडचणीत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागू नये, यासाठी सहा वर्षांपूर्वी शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षापासून कलश सीड्सने शिष्यवृत्तीचे संपूर्ण दायित्व स्वीकारले आहे. पहिल्यावर्षी १२२ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेला हा प्रवास आता २६५ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. आजवर १ हजार ४२३ विद्यार्थ्यांना १ कोटी ७४ लाख रुपयांहून अधिक रकमेची शिष्यवृत्ती पारदर्शक प्रक्रियेद्वारे वितरित करण्यात आली आहे. शिक्षणाचा खर्च वाढत असताना कलश सीड्सने दाखवलेला विश्वास आणि दिलेले सहकार्य अत्यंत कौतुकास्पद असल्याचे सांगून त्यांनी राबविण्यात येत असलेल्या इतर विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नील सारडा यांनी केले, तर उपस्थितांचे आभार जालना एज्युकेशन फाउंडेशनचे कार्यकारी संचालक प्रा. राहुल लाहोटी यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षणप्रेमी, उद्योजक, शिक्षक, विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे विश्वस्त, विद्यार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंगळ बाजार परिसरात ३० खाटांचे नागरी आरोग्य केंद्र उभारण्याची मागणी!

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील मंगळ बाजार व लगतच्या परिसरातील नागरिकांना दर्जेदार आणि परवडणार्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या भागात ३० खाटांच्या क्षमतेचे नागरी सामुदायिक आरोग्य केंद्र (अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक दुर्गेश किशनलाल काठोठीवाले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जालना शहर महानगरपालिकेच्या आयुक्तांना लेखी निवेदन देऊन सदर प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेत समाविष्ट करून मंजुरी देण्याची मागणी केली आहे.

मंगळ बाजार आणि परिसरातील वाढती लोकसंख्या, नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा तसेच सध्या उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांवरील वाढता ताण लक्षात घेता या ठिकाणी स्वतंत्र आरोग्य केंद्राची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बालकांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळावेत, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे. प्रस्तावित ३० खाटांच्या आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), आंतरुग्ण विभाग (आयपीडी), प्राथमिक व नियमित उपचार, आपत्कालीन आरोग्यसेवा, माता-बाल आरोग्य सेवा, वैद्यकीय तपासण्या, औषधोपचार आणि प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना किरकोळ तसेच आवश्यक वैद्यकीय उपचारांसाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही. परिणामी नागरिकांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाचण्यास मदत होईल.

या आरोग्य केंद्रासाठी योग्य जागा निश्चित करून नवीन इमारत उभारणे अथवा महानगरपालिकेच्या उपलब्ध इमारतीचा विकास करून तिचा वापर करणे, आवश्यक वैद्यकीय अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचार्यांची नियुक्ती करणे, ३० खाटा, वैद्यकीय उपकरणे आणि औषधसाठा उपलब्ध करून देणे, तसेच वार्षिक देखभाल व व्यवस्थापनासाठी निधीची तरतूद करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

प्रकल्पासाठी तांत्रिक अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक काठोठीवाले यांनी केली आहे.

पान १ वरून...

दहा वर्षांची घाण उपसण्यासाठी

वर्षांपूर्वी केलेले नालीचे काम उखडून टाकावे लागले. त्यासाठी नालीवर अंथरण्यात आलेली लोखंडी गजांची जाळी देखील कापून काढावी लागली असून गेले आठवडाभर गाळ काढण्याचे आणि वाहून नेण्याचे काम सुरू असतानाही गाळ आणि घाण संपत नसल्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या यंत्रणेने स्पष्ट केले. संपूर्ण गाळ काढून नाला वापरण्यायोग्य होण्यासाठी गांधी चमन ते शनि मंदिर दरम्यानचा सिमेंट रस्ता देखील खोदण्याची शक्यता जाणकारांनी वर्तविली आहे.

टाऊन हॉलपासून रेल्वेस्थानक परिसरातील नाल्याला जोडला जाणारा हा नाला गेलया दहा बारा वर्षांपासून घाणीमुळे पूर्णतः असलेला आणि चोकअप झालेला असल्याच्या तक्रारी त्याकाळी करण्यात आल्याने त्याच वेळी या नाल्याच्या सफाईच्या कामासाठी तत्कालीन पालिका प्रशासनाने निर्णय घेतला होता. शिवाय त्या नाल्याच्या कामासाठी सुमारे पंचवीस लाख रूपये खर्चाची तरतूद असलेला प्रस्ताव देखील तयार करण्यात आला होता. मात्र त्यानंतर ते कायम होऊ शकले नव्हते.

अशा प्रकारचे चोकअप झालेले इतरही नाले रामतीर्थ रस्ता, मंगळबाजार आणि अन्य भागातही असून महापालिकेची स्वच्छता विभागाची यंत्रणा अशा प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी तात्पुरती मलमपट्टी करून टाळाटाळ करीत असण्याच्या तक्रारी आहेत. सुमारे आठ दहा वर्षांपासून शहरातील स्वच्छता आणि सांडपाणी वाहून जाण्यासाठीच्या गल्लोगल्लीच्या नाल्या आणि टाऊन हॉल तसेच रामतीर्थ स्मशानभूमी मार्गावरील मोठमोठे नाले पूर्णपणे चोकअप होऊन निरूपयोगी ठरले असताना जालना पालिकेला २०२० मध्ये स्वच्छ भारत अभियानात राज्यात सहाव्या क्रमांकाचे आणि देशात तेवीसाव्या क्रमांकाचे पारितोषिक दिले जाणे केवळ हस्यास्पदच नव्हे तर त्या अभियानाच्या एकंदर अंमलबजावणीवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे नक्कीच आहे. या नाल्याच्या कामासंदर्भात महापालिकेचे 'तज्ज्ञ' महानगर अभियंता सय्यद सऊद यांच्याशी वारंवार संपर्क केला असता ते बांधकाम विभागाचे नसल्याचा दावा करीत त्यांनी कानावर हात ठेवले. तर स्वच्छता विभागप्रमुख सुधीर डहाळे हे देखील या नाल्याच्या कामासह शहरातील इतरही ओसंडून वाहणाऱ्या आणि तुंबलेल्या नाल्यांबद्दल आवश्यक ती माहिती देऊ शकले नाहीत. या नाल्याच्या कामासंदर्भात महापालिकेतील अन्य संबंधित अधिकाऱ्यांसह पालिका आयुक्तांनी देखील भ्रमणध्वनीद्वारे केलेल्या संपर्काला प्रतिसाद दिला नाही.

पोलिसांना गुटख्याची माहिती

मागील बाजुस मोकळ्या जागेत एका लोखंडी पत्र्याच्या शेड मध्ये राज्यात बंदी असलेल्या गुटखा त्याच्या स्वतःचा आर्थीक फायदा करण्यासाठी ताब्यात बाळगुन विक्री करण्यासाठी साठा केला केल्याचे आढळून आले होते. त्यावरून पोलिसांनी धाड टाकून केलेल्या कारवाईत ११ हजार ८०५ रु. चा मुद्देमाल जप्त केला होता.

या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल दादाराव देवगुडे यांच्या फिर्यादी वरून सागर बाजीराव चाळक याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. न. ७२०/२०२६ भा. न्या. सं. १२३, २७४,२७५, २२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विहिरीत पडलेला मोबाईल

विहिरीत पडल्याने जखमी झाल्याने त्यांना अंबाजोगाईच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अशी माहिती सरपंच इंदूबाई पंढरी शेप यांचे पुत्र डॉ. सचिन शेप यांनी दिली.

पाण्यासाठीचे राहुल शिंदे यांचे उपोषण मागे

लाडेवडगाव येथे कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. दलितवस्तीला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करावा. मागासवर्गीय मजुरांना कायमस्वरूपी रोजगार द्यावा. जलजीवन पाणी पुरवठा योजनेचे अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करावे. या मागणीसाठी बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे जिल्हाध्यक्ष राहुल शिंदे व इतर नागरिक दोन दिवस अंबाजोगाईच्या उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर उपोषणाला बसले होते. यावेळी उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी उपोषणस्थळी गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांना वित्त आयोगाच्या निधीतून बोअर घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर राहुल शिंदे व इतर नागरिकांनी बुधवारी रात्री उपोषण मागे घेतले होते.

पाच बोअर अधिग्रहणामुळे टँकर मंजूर नाही

गावातील पाणी पुरवठा करणारी विहीर कोरडी पडल्याने गावात पाच बोअर अधिग्रहण करून पाणी पुरवठा केला जात आहे. टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या मागणीचा प्रस्ताव टंचाई विभागाकडे सादर केला होता; मात्र क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी गावात पाहणी केली असता अधिग्रहण केलेल्या बोअरला पाणी असल्याचा अहवाल दिला आहे. त्यामुळे आणखी टँकर मंजूर झालेले नाही.

पाडळसिंगी टोलनाक्यावर

रवींद्र इंगळे यांची आक्रमक आणि अभ्यासपूर्ण भूमिका तसेच विवेकानंद पाटील यांची प्रभावी वक्तृत्वशैली यामुळे पाडळसिंगी टोलनाक्यावरील हे आंदोलन मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या हक्कांचा बुलंद आवाज ठरले. शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेऊन शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, हीच या आंदोलनातून प्रमुख अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष राजू गायके व श्रीनिवास भोसले उपस्थित होते.

पोलिसांची वाळूमाफियांवर धडाकेबाज

हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक देवकते, पोलीस अंमलदार काळे, जाधव, बहीरवाळ, शेंडगे आणि उघडे यांनी सहभाग घेतला.

एकीकडे अवैध धंद्यांवर पोलिसांचा वचक निर्माण करण्याची चर्चा सुरू असतानाच, आता थेट गोदावरीच्या पात्रातील वाळूचोरांवर कारवाई झाल्याने वाळूमाफियांचे धाबे दणाणले आहेत. एपीआय देवकते यांच्या कारवाईचा धडाका सुरूच असल्याचे या कारवाईतून दिसून आले. पुढील पोलीस तपास व कायदेशीर कारवाई सुरू आहे.

पान ६ वरून...

आ.अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष

पायाला दुखापत असल्याने काही दिवस आराम करण्याची विनंती केली होती. मात्र, त्यावर आमदार खोतकर यांनी 'नाही, जनतेसाठी आपण गेलेच पाहिजे,' असे सांगितले. यातून जनतेप्रती असलेली त्यांची बांधिलकी दिसून येते.

पुढे बोलताना शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर यांनी जालना शहरातील झोपडपट्टीधारकांच्या पी.आर. कार्डचा प्रश्नही अधोरेखित केला. हा प्रश्न वारंवार सभागृहात उपस्थित करून झोपडपट्टीधारक आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या मनोगतात जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव प्रयत्नशील असल्याचे सांगितले. जालना शहरातील पाणीप्रश्न, विजेचा प्रश्न तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध समस्या सोडविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. विविध विकासकामे आणि उपक्रमांच्या माध्यमातून जालना शहराचा विकास घडवून आणणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील मूलभूत सुविधांचा विकास, नागरिकांच्या समस्या सोडविणे आणि विकासकामांना गती देणे यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करणार असल्याचेही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी यावेळी नमूद केले. याचे आयोजन मा. नगरसेविका सौ. अनिताताई विष्णु वाघमारे, विष्णू वाघमारे व विकी विष्णु वाघमारे व मित्र मंडळ प्रभाग क्रमांक ०७ यांनी केले..

या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, मनपा महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, विरोधी पक्षनेते कमलेश खरे, दिनेश भगत, शिवा शेळके, बाला परदेशी, रामकिसन दाभाडे, गणपत धोत्रे, उत्तमराव वाघमारे, नरेश खुदभैये, रमेश रोडिये, नितीन जांगडे, संतोष शिकारे, शिवा श्रीमाळी, नंदू खर्डेकर, अनिता वाघ, रणजीत मगरे, आकाश खरे, विनोद मोरे यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला भगिनी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी या विकासकामाचे स्वागत केले. परिसराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांची कामे मार्गी लागत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. उत्साहपूर्ण वातावरणात हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

कामगारांसाठी १८ योजनांची माहिती एकाच

उपचारासाठी आर्थिक मदत चड-उखढ प्रशिक्षण शिलाई मशीन कॉम्प्युटर टायपिंग उच्च शिक्षण परदेशातील उच्च शिक्षण क्रीडा क्षेत्रातील प्रोत्साहन शैक्षणिक पुस्तक खरेदीसाठी ५० टक्के सहाय्य साहित्य प्रकाशन अनुदान आणि वाहनचालक प्रशिक्षण अशा योजनांचाही समावेश आहे.

ऑनलाइन अर्ज आणि निश्चित कालमर्यादा

या शासन निर्णयातील योजनांसाठी चरहरऊह २.० प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. परिशिष्टातील योजनांनुसार अर्ज निकाली काढण्यासाठी कामगार कल्याण मंडळाच्या योजनांसाठी २१ दिवस तर बांधकाम कामगार मंडळाच्या योजनांसाठी ४५ दिवसांची कालमर्यादा नमूद करण्यात आली आहे.

योजनांची माहिती कामगारांपर्यंत पोहोचणे आवश्यक

आजही अनेक बांधकाम कामगार गवंडी मजूर प्लास्टर कामगार सेंट्रिंग कामगार हमाल आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना शासनाच्या विविध योजनांची पुरेशी माहिती नसते. काही कामगारांना नोंदणी नूतनीकरण आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती नसल्यामुळे ते शासकीय लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे संबंधित कामगार विभाग, कामगार कल्याण मंडळ आणि स्थानिक प्रशासनाने या योजनांची माहिती गावोगावी व शहरातील कामगार वस्त्यांमध्ये पोहोचवावी. पात्र कामगारांना अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन करावे आणि मंजूर लाभ वेळेत मिळतील यासाठी विशेष लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कामगार हा विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या कष्टाला सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेची जोड मिळाली पाहिजे. शासनाच्या योजनांचा लाभ केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष गरजू कामगारांपर्यंत पोहोचणे हीच खरी कामगार हिताची भूमिका ठरेल.

कपिलधारच्या भूमीत शिवा

सप्टेंबर २००७ आणि दि. १४ मार्च २००८ रोजी मंत्रालयात शिवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या. या बैठकांमध्ये कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी दुपारी ठीक ४ वाजता महाराष्ट्र शासनाच्या वतीने किमान बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शासकीय महापूजा करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार दरवर्षी ही परंपरा जपली जात आहे.

महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणातून लाखो भाविकांची उपस्थिती

श्री क्षेत्र कपिलधारची यात्रा ही वीरशैव-लिंगायत समाजासाठी अत्यंत श्रद्धेची आणि महत्त्वाची मानली जाते. महाराष्ट्रासह तेलंगणा आणि कर्नाटक राज्यांतून सुमारे पाच ते सहा लाख समाजबांधव या यात्रेसाठी आणि शिवा संघटनेच्या राज्यव्यापी मेळाव्यासाठी उपस्थित राहत असल्याचा संघटनेचा अंदाज आहे. अनेक भाविक पायी दिंड्यांच्या माध्यमातून, तर काही वाहन रॅली काढून कपिलधार येथे दाखल होतात. भक्तिमय वातावरण, ढोल-ताशांचा गजर आणि 'जय शिवा'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून जातो.

या मेळाव्याच्या माध्यमातून वीरशैव-लिंगायत समाजाचे संघटन, सामाजिक एकजूट, धार्मिक परंपरांचे जतन आणि समाजाच्या विविध प्रश्नांवर विचारविनिमय केला जातो. समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे कार्यही या व्यासपीठाच्या माध्यमातून केले जाते.

हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

यंदा ३१ वा राज्यव्यापी वार्षिक मेळावा आणि २५ वी शासकीय महापूजा एकाच दिवशी होत असल्याने या सोहळ्याची जय्

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

PRGI.NO.MHMAR/26/A0224

पुणे जिल्हा आवृत्ती – सोमवार,दि.२३ नोव्हेंबर २०२६– पान नं.३

आळंदी मंदिरात एकादशी परंपरेने साजरीइंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती उत्साहात पालखीची हरिनाम गजरात नगरप्रदक्षिणा

आळंदी प्रतिनिधी आळंदीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात भागवत एकादशी दिनी लक्षवेधी पुष्प सजावट भाविकांचे लक्ष वेधत होती. श्रींचे दर्शनास भाविकांनी गर्दी केली होती. श्रींचे पालखीची हरिनाम गजरात नगरप्रदक्षिणा झाली. इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी संयोजक अनिताताई झुजम, अर्जुन मेदनकर, गोविंद ठाकूर, बाबासाहेब भंडारे, बाबुराव मोरे, सरस्वती भागवत, नीलम कुरधोंडकर, अनिता शिंदे, शिला कुलकर्णी, उषा पाटील, कौसल्या देवरे, पुष्पा लेंडघर, तारामती गोरे, काशीबाई अडकने, जयश्री भागवत, उषाताई काकडे, चेतनाताई ढमढेरे आदी मान्यवर उपस्थित होते.



खा. रामराव वडकुते यांचे हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन

दिल्लीत एम्स रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास; धनगर समाजासह बहुजन चळवळीचा बुलंद आवाज हरपला

राज्यसभेचे खासदार तथा भाजपचे ज्येष्ठ नेते रामराव सखाराम वडकुते (वय ७२) यांचे रविवारी (दि. २२) पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास नवी दिल्ली येथील एम्स रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. एका कार्यक्रमानिमित्त ते उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे गेले होते. तेथे अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने परभणी, हिंगोली–लीसह संपूर्ण मराठवाड्यात शोककळा पसरली आहे. रामराव वडकुते यांचा जन्म १ जुलै १९५४ रोजी झाला. परभणीच्या श्री शिवाजी महाविद्यालयातून त्यांनी बी.एस्सी. (ऑनर्स, गणित) ही पदवी प्राप्त केली. सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या वडकुते यांनी सामाजिक कार्यातून सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. १९८८ मध्ये धनगर समाज उन्नती मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी समाजकार्याला दिशा दिली. परभणी व नांदेड जिल्ह्यांत सामाजिक कार्याचा विस्तार केला.त्यांनी सिंगणापूर येथील नरसिंह सहकारी कारखान्याचे संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे अध्यक्ष तसेच २००४ मध्ये कळमनुरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतिनिधित्व केले. जून २०१८ मध्ये राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. २०१९ पासून भाजपामध्ये सक्रिय झाले. पुढे भाजपाचे हिंगोली जिल्हा अध्यक्ष व विविध पद सांभाळले. ८ महिन्यांपूर्वी त्यांची



राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती झाली होती.गरीब, नी ंत परभणीतील कल्याण नगर येथील राहत्या घरी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा च्या दरम्यान हिंगोली येथे त्यांच्यावर अंत्यविधी करण्यात येणार आहे.**राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी श्रद्धांजली अर्पण करताना**, सर्वसामान्य कुटुंबातून संघर्षाच्या बळावर देशाच्या सर्वोच्च सभागृहापर्यंत पोहोचलेले नेतृत्व हरपल्याचे म्हटले. धनगर समाजासह बहुजन समाजाच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला. त्यांच्या निधनाने राजकीय व सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शोक व्यक्त केला.** वडकुते हे सालस, साधे आणि समर्पित व्यक्तिमत्त्व होते. हिंगोली जिल्ह्यात भाजपच्या संघटनात्मक बांधणीत त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. धनगर समाजासाठी तसेच सहकार क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले. तळागाळातील समाजाबद्दल त्यांना विशेष कणव होती, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

पालम शहरातील जागोजागी अतिक्रमणाचा विळखा नगरपंचायत कुंभकर्ण झोपेत



शहरातील मुख्य पाईपलाईन आणि सार्वजनिक नालीवर मोठ्या प्रमाणावर झालेल्या अवैध अतिक्रमणामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा तुटवडा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी ॲड. मगदूम गफार कुरेशी आणि परिसरातील नागरिक, पालम शहरातील परभणी रोड ते शासकीय धान्य गोदामाकडे जाणाऱ्या जुन्या कोळवाडी रोडवरील नगर पंचायतीच्या मुख्य पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनवर आणि सार्वजनिक नालीवर काही लोकांनी बेकायदेशीर पक्के बांधकाम व अतिक्रमण केले आहे. दूषित पाणी आणि रोगराईचा धोकाः या अतिक्रमणामुळे पाईपलाईनची दुरुस्ती करणे अशक्य झाले असून पाण्याचा दाब कमी झाला आहे. तसेच नाल्यांचा निचरा बंद झाल्याने सांडपाणी लोकांच्या घरात शिरत असून शहरात रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. पाईपलाईनवरील सर्व अतिक्रमण ७ दिवसांच्या आत मोजणी करून काढून टाकावे. पाईप लाईनच्या दोन्ही बाजूंना जागा पूर्णपणे मोकळी करावी अशी मागणी ॲड. मगदूम कुरेशी, रामप्रसाद कदम, ॲड. बी.डी. गोरे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

भाजपचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचे निधन २४ नोव्हेंबर रोजी हिंगोलीत अंत्यसंस्कार

हिंगोली । भाजपचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. चालताना त्रास जाणवल्याने ते स्वतःहून रुग्णालयात दाखल झाले होते. मात्र उपचारादरम्यान मध्यरात्री त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. रामराव वडकुते हे धनगर समाजाचे महत्त्वाचे नेते म्हणून ओळखले जात होते. अवघ्या आठ महिन्यांपूर्वीच त्यांना भाजपने राज्यसभेवर संधी दिली होती. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. रामरावजी वडकुते साहेब यांना उपचारासाठी २० नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्ली येथील एम्स () रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी २१ नोव्हेंबर रोजी अचानक त्यांची प्रकृती खालावली आणि रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कारासंदर्भातील नियोजन जाहीर करण्यात आले आहे. सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी त्यांचे पार्थिव छत्रपती संभाजीनगर येथे आणण्यात येणार आहे. त्यानंतर परभणी येथील कल्याणनगरमधील निवासस्थानी सकाळी १०.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत अंत्यदर्शनासाठी पार्थिव ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर पार्थिव हिंगोली येथे आणण्यात येईल. मंगळवार, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हिंगोली येथील महाकाली नगर, अकोला बायपास येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी विधानसभा मतदारसंघात त्यांचे मोठे कार्य होते. माजी आमदार म्हणूनही त्यांची ओळख होती. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळाली होती, मात्र त्यात त्यांचा पराभव झाला. २००९ मध्ये त्यांना तिकीट नाकारण्यात आले होते. त्यानंतर २०१४ मध्ये राष्ट्रवादीने त्यांना विधानपरिषदेवर पाठवून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी वडकुते यांनी राष्ट्रवादीतून भाजपमध्ये प्रवेश केला. २०२१ मध्ये त्यांची हिंगोली भाजप जिल्हाध्यक्षपदी निवड झाली. हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे भाजप निवडणूक प्रमुख आणि प्रभारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. सात वर्षांनंतर रामराव वडकुते यांना भाजपने राज्यसभेवर संधी दिली होती.



आ.डॉ.पाटील यांचा मतदार संघात प्राथमिक आभार दौरा पूर्ण...

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून आलेले आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी पहिल्या टप्प्यातील प्राथमिक आभार दौरा पूर्ण केला आहे. या दौऱ्यात पदवीधरांच्या भेटीगाठींसह शिक्षक संघटना, प्राध्यापकांच्या संघटना आणि वकील संघांना भेटी देऊन त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. समोर आलेल्या मागण्यांबाबत संबंधित मंत्र्यांना निवेदने पाठविण्यात आली असून, आगामी विधिमंडळ अधिवेशनात पदवीधरांचे प्रश्न मांडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.२९ ऑक्टोबर रोजी पहाटे निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर डॉ. पाटील यांनी मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या. निकालापासून २२ नोव्हेंबरपर्यंत मराठवाड्यातील जवळपास सर्व जिल्हा मुख्यालयांना आणि काही तालुक्यांच्या ठिकाणी भेटी देऊन त्यांनी पदवीधर, शिक्षक, प्राध्यापक, वकील, युवक तसेच निवडणुकीत योगदान दिलेल्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष आभार मानले.दौऱ्यात विविध शिक्षक संघटना, प्राध्यापकांच्या संघटना आणि वकील संघांच्या पदाधिकाऱ्यांशी व सदस्यांशी संवाद साधण्यात आला. त्यांच्या व्यावसायिक व सेवाविषयक अडचणी, प्रलंबित मागण्या आणि शासनस्तरावर पाठपुरावा आवश्यक असलेल्या प्रश्नांची माहिती घेण्यात आली. संघटनांनी मांडलेल्या मागण्या आणि दिलेली निवेदने यांची दखल घेऊन संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्याची भूमिका डॉ. पाटील यांनी स्पष्ट केली.पदवीधरांशी झालेल्या संवादात रोजगाराच्या संधी, रखडलेली भरती, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी, अभ्यासिकांची आवश्यकता आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर चर्चा झाली. या समस्या प्रत्यक्ष समजून



घेण्यासोबतच त्यांच्या निराकरणासाठी संबंधित मंत्र्यांना निवेदने पाठविण्यात आली आहेत. आगामी अधिवेशनात मांडावयाच्या प्रश्नांना दिशा देण्यासाठीही या दौऱ्यातील संवाद उपयुक्त ठरला.''पदवीधरांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास ही मोठी जबाबदारी आहे. या प्राथमिक आभार दौऱ्यात पदवीधरांसह शिक्षक, प्राध्यापक आणि वकील बांधवांच्या संघटनांना भेटून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. त्यांच्या मागण्यांबाबत संबंधित मंत्र्यांना निवेदने पाठविली आहेत. आगामी अधिवेशनात हे प्रश्न मांडून त्यांच्या सोडवणुकीसाठी शासनदरबारी आणि विधिमंडळात सातत्याने पाठपुरावा करणार आहे,'' असे डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी सांगितले.हा दौरा प्राथमिक स्वरूपाचा असल्याने वेळेच्या मर्यादेमुळे प्रत्येक तालुक्यात आणि प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचता आलेले नाही. अधिवेशनानंतर तालुकानिहाय सविस्तर दौरा करून पदवीधर, शिक्षक, प्राध्यापक, वकील आणि युवकांशी संवाद साधणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पदवीधरांशी नियमित संपर्क ठेवून त्यांच्या प्रश्नांवर ठोस कार्यवाहीसाठी प्रयत्न करणे आणि विधिमंडळात त्यांच्या मागण्यांना आवाज देणे, यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

भजन स्पर्धेत महिला विभागात लातुर तर पुरूष विभागात कळंब प्रथम

कामगार कल्याण मंडळाच्या वतीने धाराशिव येथे स्पर्धा लातुर, बीड, धाराशिव येथील ८ संघाचा सहभाग

विजय पिसे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित खुल्या गटस्तरीय महिला भजन स्पर्धेत लातुर येथील भजनी संघाने पहिले बक्षीस पटकाविले. अंबाजोगाई द्वितीय तर उदगीर येथील भजनी संघाने तृतीय बक्षीस मिळविले. तर कामगार पुरुष भजन स्पर्धेत कळंब प्रथम, परळी द्वितीय तर निलंग्याला तृतीय पारितोषिक मिळाले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.धाराशिव येथील कामगार कल्याण भवनमध्ये या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत लातुर, बीड व धाराशिव जिल्ह्यातील ८ भजनी मंडळानी सहभाग घेतला.स्पर्धेत प्रत्येक मंडळास भजन सादरीकरणासाठी २५ मिनिटांचा वेळ देण्यात आला. या स्पर्धेत सहभागी संघांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची व परिक्षकांचे लक्ष वेधले. या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी पो–लीस उपअधीक्षक योगेश वेळापुरे तर प्रमुख पाहूणे, अखिल भारतीय सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष गोपाळ सुरवसे, हभप प्रकाश महाराज गवळी, नगरसेवक गणेश घोडके, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, परिक्षक सतिश सुर्यवंशी, महादेव अडसुळ, भारतीबाई अडसुळ यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस यानी केले. महिला भजन स्पर्धेतचे बक्षीस वितरण जि.प. सदस्या प्रतिक्षा सुरवसे, हभप प्रियंका आडसुळ, गुणवंत कामगार कुलदीप सावंत, नॅचरल शूगरचे बनेश्वर सरडे, विठ्ठलसाई कारखान्याचे आनंदराव मानाळे यांच्या उपस्थितीत झाले. तसेच उत्कृष्ट गायक, पेटीवादक, मृदंगवादक व तालसंच यासाठी ही वैयक्तीक बक्षीसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्र संचालक संगमेश्वर जिरगे यानी केले तर आभार केंद्र संचालक शंकर काशीद यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



कोकण भवनातील जनसुनावणीत काझी, उलमा, मौलाना आणि महिला प्रतिनिधींचा मोठ्या संख्येने सहभाग; मुस्लिम पर्सनल लॉ व घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणाची मागणी

समान नागरी कायद्याच्या विरोधात ऑल इंडिया उलमा बोर्डाच्या हरकती व सूचना

नवी मुंबई/प्रतिनिधी

समान नागरी कायद्याच्या () संदर्भात कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित जनसुनावणी व जनसूचना प्रक्रियेत ऑल इंडिया उलमा बोर्ड (रजि.) कोकण विभागाच्या वतीने मोठ्या संख्येने पदाधिकारी, काझी, उलमा, मौलाना, महिला प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून कायद्याबाबत हरकती व सूचना संबंधित प्रशासनासमोर मांडल्या.रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या या जनस–ुनावणीत ठाणे जिल्हा, नवी मुंबई, रायगड आणि कोकण विभागातील विविध भागांतून बोर्डाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. समान नागरी कायद्याच्या प्रस्तावित तरतुदी, मुस्लिम पर्सनल लॉ, धार्मिक स्वातंत्र्य, भारतीय संविधानाने प्रदान केलेले मूलभूत अधिकार आणि अल्पसंख्याकांच्या घटनात्मक हक्कांशी संबंधित विविध मुद्द्यांवर प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली. या सहभागाचे नेतृत्व हाजी शहनवाज खान यांनी केले. ते महाराष्ट्र कोअर कमिटी,



शूरा व एक्झिक्युटिव्ह मेंबर तसेच कोकण विभाग आणि गोवा प्रभारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील टीमने जनसुनावणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. शफी सय्यद आणि रायगड जिल्हा महिला अध्यक्ष कुलसुम शेख यांनी प्रतिनिधित्व करत मुस्लिम पर्सनल लॉचे संरक्षण, धार्मिक स्वातंत्र्य आणि संविधानाने दिलेल्या अधिकारांशी संबंधित महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. समान नागरी कायद्याच्या संदर्भात समाजाच्या भावना, कायदेशीर आक्षेप आणि घटनात्मक दृष्टिकोन संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आले. जनसुनावणीत महिला प्रतिनिधी, काझी, उलमा आणि मौलाना यांची लक्षणीय उपस्थिती होती. लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिकांना कायद्याबाबत आपले मत, हरकती आणि सूचना मांडण्याचा अधिकार असून, त्याच घटनात्मक व लोकशाही मार्गाने ऑल इंडिया उलमा बोर्डाने आपली भूमिका प्रशासनासमोर मांडल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मुस्लिम पर्सनल लॉचे संरक्षण, धार्मिक स्वातंत्र्याचा सन्मान आणि भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या मूलभूत अधिकारांचे रक्षण हे बोर्डाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करण्यात आले. समान नागरी कायद्याच्या संदर्भात कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. या जनस–ुनावणीतील सहभागातून मुस्लिम समाजाच्या घटनात्मक हक्कांबाबत जागरूकता निर्माण करण्यासह संबंधित प्रशासनापर्यंत समाजाची भूमिका पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे ऑल इंडिया उलमा बोर्डाच्या कोकण विभागाच्या वतीने प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

खारघरमध्ये 'पॅराडाईज परफ्यूम'चे शानदार उद्घाटन नगरसेवक हरेश केणी यांच्या हस्ते

प्रीमियम आणि लक्झरी सुगंधांची खास श्रेणी उपलब्ध...

खारघर/साबीर शेख

खारघर सेक्टर ३६ येथील पॅराडाईज मॉल, साई वर्ल्ड एम्पायर येथे 'पॅराडाईज परफ्यूम' या नव्या दालनाचा उद्घाटन सोहळा रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. नगरसेवक हरेश केणी यांच्या हस्ते फीत कापून या दालनाचे उद्घाटन करण्यात आले.सुगंध प्रेमींच्यासाठी मेजवानी प्रीमियम आणि लक्झरी परफ्यूमच्या विविध प्रकारांची खास श्रेणी ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या दालनात विविध ब्रँड्सचे आकर्षक आणि दर्जेदार सुगंध ग्राहकांना अनुभवता येणार आहेत. 'फ्रॅग्रन्स ऑफ पॅराडाईज' ही संकल्पना घेऊन सुरू झालेल्या



या व्यवसायामुळे खारघरच्या व्यावसायिक क्षेत्रात आणखी एका नव्या दालनाची भर पडली असून, सुगंधप्रेमी ग्राहकांसाठी खरेदीचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे.उद्घाटन सोहळ्याला समाजसेवक अब्दुल हाई, इरफान शेख, डॉ. कुमार विवेक,अफरोज शेख, डॉ. मोहम्मद फझुल रेहमान खान, प्रेरणा गावंड, तरन्नुम सय्यद, अक्षय कांबळे,तबस्सुम मुजावर, राम शिंदे,हिना शेख, मुस्कान शेख, अलविरा शेख आणि रिजवाना पठाण यांच्यासह अनेक मित्रमंडळी व मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी नव्या व्यवसायाच्या शुभारंभाबद्दल संचालक रफिक मोमीन व टीमचे अभिनंदन करून पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पनवेल परिसरातील ग्राहकांना दर्जेदार आणि प्रीमियम सुगंधांची अनुभूती देणारे 'पॅराडाईज परफ्यूम' हे दालन ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

मकसूद पटेल
जिल्हा प्रतिनिधी ९७६७७८५८५५

शेख मौला शेख उस्मान
उपसंपादक ९७६६६६४९४९

PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.२३ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

नायगाव-उमरी रस्त्यावरील ढिगाऱ्याने घेतला युवकाचा बळी!

नायगाव । प्रतिनिधी

नायगाव ते उमरी रस्त्याच्या कामादरम्यान इकळीमाळ गावाजवळ रस्त्यावर टाकण्यात आलेल्या माती, मुरूम व गिट्टीच्या ढिगाऱ्यामुळे झालेल्या अपघातात ३३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. २०) रात्री घडली.

परमेश्वर बाबुराव जोंधळे, रा. इकळी (माळ), ता. नायगाव असे मृत युवकाचे नाव असून, रस्ते कामातील निष्काळजीपणामुळे त्याचा जीव गेल्याचा आरोप नातेवाईकांनी पुन्हा एकदा केला आहे. परमेश्वर जोंधळे हे दुचाकीवरून घरी जात असताना २० नोव्हेंबरच्या रात्री सव्वा नऊच्या सुमारास रस्त्याच्या कामासाठी टाकण्यात आलेल्या ढिगाऱ्यावर त्याची दुचाकी आदळली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने इकळीमाळ गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

तरुणाचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने इकळीमाळ गावासह परिसरात संताप व्यक्त होत आहे. संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या युवकाचा अचानक मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रस्त्याचे काम सुरू असताना आवश्यक सुरक्षा व्यवस्था, धोक्याचे फलक, रात्रीच्या वेळी सूचना देणारे दिवे तसेच अडथळ्यांची योग्य मांडणी करणे अपेक्षित असते. मात्र, या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

याच ठिकाणी यापूर्वीही किरकोळ अपघात झाल्याच्या घटना घडल्या असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, त्यातून कोणताही बोध घेतला जात नसल्याने परमेश्वर जोंधळे याच्यावर जीव गमावण्याची वेळ आली. रस्त्याचे काम करणाऱ्या यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे वारंवार अपघात होत असतील आणि त्यातून निष्पाप नागरिकांचे जीव जात असतील, तर अशा कामाच्या पद्धतीवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

परमेश्वर जोंधळे याच्या मृत्यूची सखोल चौकशी करून अपघातास कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीची जबाबदारी निश्चित करावी, तसेच रस्त्याचे काम करणाऱ्या संबंधित यंत्रणेवर कारवाई करावी, अशी मागणी मृताच्या कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

रस्त्याचे काम की मृत्यूचा सापळा?

रस्त्याचे काम सुरू असताना माती, मुरूम आणि गिट्टीचे ढिगारे रस्त्यावर टाकून ठेवले जातात. मात्र, रात्रीच्या वेळी वाहनचालकांना दिसण्यासाठी धोक्याचे फलक, रिफ्लेक्टर, बॅरिकेड्स आणि प्रकाश व्यवस्था असणे आवश्यक आहे. या मूलभूत सुरक्षा उपायांकडे दुर्लक्ष झाल्यास रस्ते अपघातांना निमंत्रण मिळत असून, निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत आहे. संबंधित विभागाने आता तरी जागे होऊन सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अन्यथा अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

लोहेकर-लव्हेकरांचा आशीर्वाद नेहमीच माझ्या सोबत : आमदार प्रतापराव पाटील|चिखलीकर

बसस्थानकलगत प्रियदर्शनी नगरात नव्या रोडचे लोकार्पण

लोहा । अशोक सोनकांबळे

लोहा शहर व लव्हेकर कुटुंबियांनी मला नेहमीच आशीर्वाद दिले आहेत. त्याच ताकदीवर आपण इथपर्यंत आलो आहोत. या शहरात नगराध्यक्ष शरद पवार व टीम चांगले काम करत आहेत. शहरातील नागरिकांनी सार्वजनिक रस्ते, इमारती, पाणी तसेच मूलभूत सुविधा या माझे शहर, सुंदर व स्वच्छ शहर या भावनेतून जोपासायला हव्यात. या शहरासाठी लव्हेकर परिवाराने खूप काही दिले आहे. शहरातील विविध विकासकामांना निधी कमी पडणार नाही. बसस्थानकलगत प्रियदर्शनी-इंदिरानगर भागाला नवी कनेक्टिव्हिटी मिळाली आहे, असे प्रतिपादन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

लोहा शहरातील बसस्थानकलगत प्रियदर्शनी-इंदिरानगर भागाकडे जाणाऱ्या रस्त्याचे लोकार्पण आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसिद्ध ज्येष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. लक्ष्मीकांत लव्हेकर - डॉ. श्रीकांत लव्हेकर यांच्या पुढाकाराने हा सोहळा पार पडला. या रस्त्यासाठी त्यांनी स्वतःची जागा दिली, त्यामुळे या भागाला नवी ओळख निर्माण झाली आहे.



या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. लक्ष्मीकांत लव्हेकर होते. तर व्यासपीठावर नगराध्यक्ष शरद पवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर, उपअभियंता सुमित पाटील, उपअभियंता शिवाजी राठोड, मुख्याधिकारी संदीप भोळे, स्वाभिमान संभाजी ब्रिगेड अध्यक्ष माधवराव देवसरकर, सचिन पाटील चिखलीकर, महिला बँकेचे संचालक डॉ. श्रीकांत लव्हेकर, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, पाणीपुरवठा प्रकल्प अधिकारी महेंद्र, माजी सभापती बाबुराव केंद्रे, माजी पं. स. सभापती आनंदराव पाटील, डॉ. अश्विन लव्हेकर, नगरसेवक बालाजी खिल्लारे, सतीश निखाते, नगरसेविका सुशीलादेवी परिहार, पूजा खिल्लारे, श्याम पाटील, कंत्राटदार ऋषी पाटील, पंकज परिहार, तुकाराम दाढेल, शंकर वट्टमवार, प्राचार्य शिरीष लव्हेकर यासह सर्व मान्यवर उपस्थित होते.

आ. प्रतापराव पाटील यांनी लोहा शहरात नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख व त्यांची टीम चांगले काम करत आहेत असे सांगून माझे शहर ही भावना सर्वांच्या मनात निर्माण व्हावी. या शहराने व लव्हेकर कुटुंबियांनी मला नेहमीच आशीर्वाद दिला आहे. रस्त्यासाठी त्यांनी जागा दिली, गेली अनेक वर्षे ते प्रयत्नशील होते, पण त्यातून मार्ग काढता आला. शिवाय येथे मंदिरासाठी जागा देण्याचे डॉक्टर लव्हेकर यांनी जाहीर केले, त्याचे लोहावासीयांच्या वतीने अभिनंदन. शहराच्या विकासासाठी निधी कमी पडणार नाही, अशी ग्वाही आ. प्रतापराव पाटील यांनी दिली.

नगराध्यक्ष शरद पवार यांनी जे जे नव्हे ते लोह्याला हवे आहे असे सांगून गार्डनला जागा, पाणीपुरवठा योजना लवकरच मार्गी लावावी अशा अनेक मागण्या त्यांनी आ. प्रतापराव पाटील यांच्याकडे केल्या. डॉ. लक्ष्मीकांत लव्हेकर यांनी आ. प्रतापरावांच्या कामाचा गौरव करत हे प्रलंबित काम पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि मंदिराला जागा देण्याचे जाहीर केले. प्रास्ताविक गटनेते भास्कर पवार यांनी केले, संचलन कौशल्य गुरुजींनी तर आभार डॉ. अश्विन लव्हेकर यांनी केले.

व्यक्तीच्या विकासासाठी संस्कारांसोबत समाजाचे सहकार्यही आवश्यक : प्रवीण गायकवाड

मुदखेड । अतीख अहेमद

व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी केवळ चांगले संस्कार पुरेसे नसून, त्या व्यक्तीला समाजाचे सहकार्य आणि पाठबळ मिळणेही तितकेच आवश्यक आहे, असे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा भारत सरकारच्या दक्षिण मध्य रेल्वे, नांदेड विभागीय उपभोक्ता सल्लागार समितीचे सदस्य प्रवीण गायकवाड यांनी केले. येथील धम्म प्रशिक्षण केंद्रात ज्येष्ठ उपासक देवराव (डी.जी.) चौदंते यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त भदंत गगनबोधी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्कार सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

यावेळी प्रवीण गायकवाड म्हणाले की, डी.जी. चौदंते यांनी आपल्या



७५ वर्षांच्या आयुष्यात सामाजिक व धम्मकार्याला स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले आहे. त्यांचे संपूर्ण जीवन त्याग, समर्पण आणि बलिदानाने व्यापलेले आहे. मात्र, एवढे योगदान देऊनही समाजाने त्यांच्या कार्याची अपेक्षित दखल घेतली नाही, ही खेदाची बाब आहे. समाजाने त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून सहकार्य केले असते, तर आज त्यांची सामाजिक वाटचाल अधिक प्रभावी आणि भक्कम झाली असती.

डी.जी. चौदंते यांनी बौद्ध धम्माचे संस्कार उराशी बाळगून आपले जीवन व्यतीत केले; मात्र त्यांच्या कार्याला समाजाचे पुरेसे सहकार्य मिळाले नाही, ही सामाजिक शोकांतिका आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येकाने सामाजिक कार्य करणाऱ्या संस्कारी व्यक्तींना प्रोत्साहन व सहकार्य देण्याची भूमिका घेतली पाहिजे. एखाद्याच्या कार्याची प्रशंसा करता आली नाही तरी किमान त्या व्यक्तीविषयी उघडपणे नकारात्मक बोलणे टाळले पाहिजे. सामाजिक कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याची आणि त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची मानसिकता निर्माण झाली, तरच समाजासोबत समाजातील व्यक्तींचाही विकास होईल. हीच डी.जी. चौदंते यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त खरी शुभेच्छा ठरेल, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष प्रशांत निखाते, वंचित बहुजन आघाडीचे मोहन कांबळे, समता सैनिक दलाचे कॅप्टन सुनील चौदंते, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख नारायणराव चौदंते, ज्येष्ठ उपासक ईश्वर सावंत, माजी मुख्याध्यापक मोहनराव सावते, ड. गुजरवाड, ड. बाबासाहेब चौदंते, बाळकृष्ण चौदंते, जयप्रकाश चौदंते, जनार्दन कोलते, चंद्रकांत हौसरे, कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना दीप व धूप प्रज्वलित करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण व पंचशील ग्रहण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रवीण गायकवाड यांच्यासह ईश्वर सावंत, गणपत चौदंते, ड. गुजरवाड आदी मान्यवरांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपासक लोखंडे यांनी केले, तर राहुल अप्पा चौदंते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सिद्धार्थ चौदंते व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पंधरा लाखांचा हायवा अन् ३ हजारांची वाळू जप्त!

महसूल पथकाची आखाडा बाळापूर परिसरात धडक कारवाई; वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर परिसरात विनापरवाना गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्यांविरोधात महसूल विभागाच्या पथकाने धडक कारवाई करत तब्बल १५ लाख रुपये किमतीचा हायवा आणि अंदाजे ३ हजार रुपये किमतीची चार ब्रास वाळू, असा एकूण १५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

२१ नोव्हेंबर रोजी रात्री सुमारे ११.२४ वाजता कृष्णापुर गावाजवळील पुलाच्या परिसरात, आखाडा बाळापूरपासून सुमारे दोन



किलोमीटर अंतरावर महसूल पथकाने ही कारवाई केली. पथकाच्या निदर्शनास संबंधित हायवामधून विनापरवाना वाळूची वाहतूक होत असल्याचे आढळून आले. त्यानंतर वाहन ताब्यात घेऊन वाळूसह मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी मंडळ अधिकारी राजनंद सदाशिव तेलेवार यांच्या फिर्यादीवरून राजेश फकीरराव गोरे रा. शिरूर, ता. हदगाव, जि. नांदेड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईमध्ये एमएच ४६ बी.वाय. ५०४२ क्रमांकाचा महिंद्रा कंपनीचा हायवा ताब्यात घेण्यात आला असून, त्यामध्ये अंदाजे चार ब्रास वाळू आढळून आली. महसूल विभागाच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीवर प्रशासनाने कठोर पवित्रा घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपीस समजपत्र देण्यात आले आहे.

ग्रामीण रुग्णालय आखाडा बाळापूर येथे रक्तदान शिबिर संपन्न; २५ रक्तदात्यांचे रक्तदान

सामाजिक बांधिलकीतून मानवसेवेचा संदेश; रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कळमनुरी । गंगासागर पंडित

ग्रामीण रुग्णालय, आखाडा बाळापूर येथे रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवेचा संदेश देण्यासाठी आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाले. या शिबिराला नागरिक, युवक तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे तसेच रक्तदानाबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला प्रतिसाद देत एकूण २५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत मानवसेवेचा आदर्श निर्माण केला.

रक्तदान शिबिरादरम्यान रक्तदात्यांची



आवश्यक तपासणी करून त्यानंतर रक्तदानाची प्रक्रिया पार पाडण्यात आली. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मदत मिळण्याबरोबरच नागरिकांमध्येही सामाजिक जबाबदारीची भावना अधिक बळकट होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. शिबिराच्या आयोजनासाठी ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध सहकार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. शिबिर सुरळीतपणे पार पडावे यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करत रक्तदात्यांना आवश्यक सहकार्य केले.

यावेळी रक्तदान करणाऱ्या सर्व २५ रक्तदात्यांचे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने विशेष कौतुक व आभार व्यक्त करण्यात आले. तसेच शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणारे अधिकारी, कर्मचारी, आरोग्य विभागातील कर्मचारी आणि सर्व सहकार्यकर्त्यांचेही आभार मानण्यात आले. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनीष बगडिया यांनी रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत रक्तदान हे अत्यंत मोलाचे सामाजिक कार्य असल्याचे सांगितले. नागरिकांनी अशा सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेऊन गरजू रुग्णांच्या मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहनही करण्यात आले. रक्तदान शिबिराच्या माध्यमातून 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' या भावनेला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळाली असून, आखाडा बाळापूर परिसरात सामाजिक बांधिलकीचा हा उपक्रम कौतुकाचा विषय ठरला आहे.

बाळूभाऊ राऊत मित्र मंडळाच्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या हस्ते उद्घाटन; शेकडो रक्तदात्यांनी केले रक्तदान

नांदेड । प्रतिनिधी

महापुरुषांचे विचार आणि शहीद जवानांच्या त्यागाचे स्मरण सामाजिक उपक्रमांतून जपण्याच्या उद्देशाने बाळूभाऊ राऊत मित्र मंडळाच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. दि.२२ नोव्हेंबर २०२६ वार रविवार रोजी नांदेड शहरातील तरोडा नाका परिसरात शेतकरी पुतळ्याच्या शेजारी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, गुरुनानक जयंती, संत रोहिदास महाराज यांच्या पुण्यतिथी तसेच २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात



शहीद झालेल्या जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकडो रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. आमदार अमरनाथ राजूरकर यांनी शिबिराला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. तसेच गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी अधिकाधिक नागरिकांनी रक्तदानासाठी पुढे यावे, असे आवाहन केले. बाळूभाऊ राऊत मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. रक्तदानासारख्या सेवाभावी उपक्रमातून समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याचे कार्य मंडळाकडून केले जात आहे.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी उमेश पाटील यांच्यासह रतन दुधाटे, प्रकाश कांबळे, पिंटू राऊत, गजू पांढरे, ओमकार यादव, प्रमोद देवकते, राजू गायकवाड, बंडू गिरगावकर, जयकुमार राऊत तसेच बाळूभाऊ राऊत मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

वै.धुंडा महाराज महाविद्यालयाचा आदर्श पाटील आंतर विद्यापीठीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी जयपूरला रवाना



देगलूर । अजीम अन्सारी

पश्चिम विभागीय स्तरावरील आंतर विद्यापीठीय बुद्धिबळ (मुले) क्रीडा स्पर्धा दिनांक २४ ते २७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अपेक्स विद्यापीठ जयपूर (राजस्थान) या ठिकाणी संपन्न होणार आहेत. या स्पर्धेसाठी वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील आदर्श बालाजी पाटील (बी.एस्सी. तृतीय वर्ष) या खेळाडूची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संघाचा कर्णधार म्हणून निवड झाली आहे.

आदर्श पाटील विद्यापीठ संघासह जयपुरला रवाना झाला असून या निवडीबद्दल मुक्ताई प्रतिष्ठानचे सचिव राजेश महाराज देगलूरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय कुलकर्णी, उपप्राचार्य तथा क्रीडा संचालक डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य डॉ.संजय अवधाने, डॉ.सदानंद ऐताल, डॉ.माळगे, डॉ.सौ. संजीवनी नेरकर, डॉ.सौ. तेजस्विनी कुलकर्णी, प्रा.अंजली रोयलवार, वरिष्ठ लिपिक सुनील देगलूरकर इत्यादींनी आदर्श पाटील या खेळाडूचे अभिनंदन करून पुढील क्रीडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

श्रीमती हनीफा बेगम यांचे दुःखद निधन

कुंडलवाडी । प्रतिनिधी

कुंडलवाडी येथील रहिवासी शेख साजिद मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरनाळी, शेख माजिद पत्रकार कुंडलवाडी यांच्या मातोश्री श्रीमती हनीफा बेगम भ्र.युसूफमियॉ यांचे आज पहाटे ४=०० वजता हदय विकाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समई त्यांचे वय ६८ वर्ष होते. त्यांची दफनविधी सायंकाळी ४=३० वाजता नमाजे असर नंतर मुन्वर मस्जिद येथे नमाजे जनाजा आदा करून शहरातील कब्रस्तान येथे करण्यात आली. त्यांच्या अंतविधी यात्रेत मित्रपरिवार, मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येत उपस्थित होते.

कहाळा येथे गांजा विक्रीवर कुंटूर पोलिसांचा छापा; तरुणाला अटक

नायगाव । प्रतिनिधी

नायगाव तालुक्यातील बरबडा पोलीस चौकीच्या हद्दीतील कहाळा येथे अवैध गांजा विक्रीविरोधात कुंटूर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ६९० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, त्याची अंदाजे किंमत ३० हजार रुपये आहे. याप्रकरणी एका २० वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक नीलब रोहन आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले व पोलीस उपनिरीक्षक सुनील जाधव यांच्या पथकाने १९ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री आठच्या सुमारास ही कारवाई केली.

राहत्या घरासमोर सुरू होती विक्री

कहाळा येथील रतन भगवान गिरी (वय २०) हा तरुण स्वतःच्या राहत्या घरासमोर गांजाची अवैध विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी नायगाव तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार, दोन शासकीय पंच, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच छायाचित्रकार यांच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी रतन गिरी याच्याकडे ६९० ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून सुमारे ३० हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला.

या प्रकरणी कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०१/२०२६ नुसार एनडीपीएस अधिनियम १९८५ मधील कलम ८(क) आणि २०(ब)(२)(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. पुढील तपासासाठी पोलिसांनी त्याच्या पोलीस कोठडीची मागणी केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विशाल भोसले करीत आहेत.

हजरत टीपू सुल्तान जयंती निमित्ताने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

उस्माननगर । प्रतिनिधी

शेर-ए -मैसूर हजरत टिपु सुलतान यांच्या जयंती निमित्ताने सामाजिक बांधिलकी जोपासत उस्माननगर येथील हजरत टीपू सुल्तान (रह) युवा मंच उस्माननगर ता.कंधार यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दि.२९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. रक्तदान हेच सर्व श्रेष्ठ दान हा संदेश देत नागरिकांनी आणि तरूणांनी दि.२९ नोव्हेंबर रविवारी सकाळी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजक शहा शकील व हजरत टीपू सुल्तान (रह.) युवा मंच उस्माननगर यांनी केले आहे.

टीपु सुल्तान यांच्या जयंतीचा उत्सव केवळ औपचारिक न ठेवता समाजोउपयोगी उपक्रमातुन साजरा करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला आहे. सध्या रूग्णालयात रक्ताची भासणारी गरज लक्षात घेता या शिबिराचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.दि २९ नोव्हेंबर रोजी हजरत टीपू सुल्तान (रह.) युवा मंच उस्माननगर यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अनुभवी डॉक्टर आणि तज्ञ वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली रक्त संकलन केले जाणार आहे. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी परिसरातील जास्तीत जास्त तरूणांनी आणि सुजाण नागरिकांनी या स्तुत्य उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे व इतरांचे प्राण वाचवण्यास हातभार लावावा, अशी विनंती आयोजक शहा शकील यांच्यासह हजरत टीपू सुल्तान (रह) युवा मंच उस्माननगर यांनी केले आहे.

कुंडलवाडी येथे क्रीडा संकुल उभारण्याची नगरसेवीका शीतल मोमईवार यांची मागणी

तालूका । मोहम्मद अफजल

शहरातील खेळाडू, तरुण, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कुंडलवाडी येथे क्रीडा संकुल उभारण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका शीतल विलास मोमईवार यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी विलास मोमईवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

कुंडलवाडीतील तरूणांची गेल्या कित्येक वर्षापासुन मागणी असुन शहरात क्रीडा संकुल नसल्याने खेळाडूंना सरावासाठी अडचणी येतात. पोलीस व सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसह शालेय विद्यार्थ्यांनाही पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे जॉगिंग ट्रॅक, मुख्य मैदान, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट मैदान, व्यायामशाळा, ओपन जिम आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह अशा सुविधा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. क्रीडा संकुलाला तत्त्वतः मंजुरी द्यावी तसेच संबंधित अधिकाऱ्यांना प्रस्ताव तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना द्याव्यात, अशी विनंती नगरसेविका शीतल मोमईवार यांच्यावतीने त्यांचे प्रतीनिधी विलास मोमईवार यांनी केली आहे.



महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ — पान नं.५



१४ हजार कोटींचा प्रकल्प मातीत; रेल कोच फॅक्टरीच्या चौकशीसाठी बेरोजगारांचा एल्गार!

मराठवाड्याच्या तरुणांच्या रोजगारावर कुणाचा डल्ला? रेल्वे कोच फॅक्टरीत स्थानिकांना डावलले

भरतीतील कथित पक्षपात, कामगारांची हकालपट्टी, महिला कर्मचाऱ्यांच्या छळाच्या तक्रारी आणि कोट्यवधींच्या व्यवहारांची चौकशी करा

अन्यथा २३ नोव्हेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

लातूर । संतोष सोनवणे

मराठवाड्यातील बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा, स्थानिक उद्योगांना कामाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि या भागाचा औद्योगिक विकास व्हावा, या अपेक्षेने लातूर येथे मराठवाडा रेल कोच फॅक्टरी उभारण्यात आली. मात्र, ज्या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील तरुणांच्या हाताला काम मिळेल, अशी स्वप्ने दाखविण्यात आली, त्याच प्रकल्पात स्थानिक तरुणांना रोजगारापासून वंचित ठेवले जात असल्याच्या गंभीर तक्रारी पुढे येत आहेत. मग ही फॅक्टरी नेमकी कोणासाठी उभारली? मराठवाड्यातील तरुणांनी केवळ बाहेरून फॅक्टरी पाहायची आणि नोकऱ्या मात्र बाहेरच्या लोकांनी घ्यायच्या का? असा संतप्त सवाल मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी संघर्ष समिती ने काँग्रेस भवन लातूर येथे पत्रकार परिषदेत उपस्थित केला आहे.

या प्रश्नांकडे मागील दोन वर्षांपासून जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. लेखी निवेदने देऊनही प्रशासनाकडून साधे उत्तर मिळत नसेल, तर सामान्य बेरोजगार तरुणांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे? प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ विलास मुळे यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा रेल कोच फॅक्टरी संघर्ष समितीच्या वतीने सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे आमरण उपोषण करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय युवती अध्यक्षा सक्षणा सलगर, धाराशिव चे शिवसेनेचे जगदीश पाटील, ड. राहुल मातोळकर, जिजाऊ ब्रिगेडच्या रंजना हासुरे,प्रवीण साळुंके, विलास मुळे, ओमकार भोईबार, कपिल धावड, विष्णुदास धायगुडे, प्रवीण सूर्यवंशी, ज्ञानेश्वर पाटील, पिराजी साठे यांनी संघर्ष समितीच्या वतीने आपली भूमिका स्पष्ट केली.

मराठवाडा रेल कोच फॅक्टरी येथे किनेट रेल्वे सोल्युशन लिमिटेड आणि तिच्या माध्यमातून कार्यरत कंत्राटदारांकडील भरती प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक पात्र तरुणांना डावलून पराज्यातील व्यक्तींना संधी दिली जात असल्याच्या तक्रारी आहेत. एवढेच नव्हे, तर कंपनीतील काही पराज्यातील अधिकाऱ्यांनी आपल्या पत्नी, भाऊ, नातेवाईक आणि मित्रपरिवारातील व्यक्तींना नोकरीत संधी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून कंपनीतील भरतीचा संपूर्ण तपशील जाहीर करावा.

कंपनीतील मॅनेजर आणि त्यापेक्षा वरिष्ठ पदांवर किती अधिकारी कार्यरत आहेत? त्यापैकी लातूर व मराठवाड्यातील किती अधिकारी आहेत? याची अधिकृत आकडेवारी जनतेसमोर आणावी. स्थानिक खढख, पॉलिटेक्निक आणि इंजिनिअरिंग महाविद्यालयांतील पात्र तरुणांसाठी विशेष भरती मेळावे घेऊन प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप आणि कायमस्वरूपी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी आहे.

स्थानिक कामगारांना कामावरून कमी करण्याचा अधिकार कुणी दिला?

किनेट रेल्वे सोल्युशन लिमिटेड आणि थर्ड पार्टी कंत्राटदारांच्या माध्यमातून काम करणाऱ्या स्थानिक कामगारांना योग्य कारणाशिवाय कामावरून कमी करण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. या प्रकरणांची स्वतंत्र चौकशी करून अन्याय झालेल्या कामगारांना नियमानुसार पुन्हा कामावर घ्यावे. स्थानिकांच्या हाताला काम देण्याऐवजी त्यांच्याच हातातील रोजगार हिरावून घेतला जात असेल, तर अशा प्रकल्पाचा स्थानिकांना नेमका फायदा काय?

महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष का?

कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात महिला कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तन आणि विनयभंगासंदर्भात दोन लेखी तक्रारी संघर्ष समितीकडे असल्याचे सांगण्यात आले. यामध्ये वर्ष २०२५ मधील कांता राजू (पर्चेस हेड) आणि सुभाष चंद्रा (एससीएम हेड) यांच्याविरोधातील तक्रारींचा समावेश असल्याचा दावा करण्यात आला आहे. फ्रेशर आणि अप्रेंटिस म्हणून काम करणाऱ्या स्थानिक तरुणींशी पदाचा गैरवापर करून गैरवर्तन झाले आहे.

या तक्रारींची स्वतंत्र, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांबाबत नियमानुसार प्रतिबंधात्मक प्रशासकीय कार्यवाही करावी. तक्रारदार महिलांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवावी आणि इतर संभाव्य तक्रारींचीही दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर असताना प्रशासन आणि कंपनी व्यवस्थापनाने याकडे दुर्लक्ष करू नये, असा इशाराही देण्यात आला आहे.

१४ हजार कोटींचा प्रकल्प; लातूर चखऊ ला किती वाटा?

वंदे भारत रेल्वेच्या उत्पादनासाठी लातूर रेल कोच फॅक्टरीला मोठ्या मूल्याचे काम मिळाले असताना लातूर चखऊ मधील स्थानिक उद्योगांना या उत्पादन साखळीत किती संधी मिळाली, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. समितीच्या माहितीनुसार, या प्रकल्पासाठी लातूरमधील उद्योगांकडून सुटे भाग पुरविले जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्थानिक उद्योगांकडे क्षमता आणि कौशल्य असतानाही त्यांना संधी का मिळत नाही? पात्र स्थानिक उद्योजकांना पुरवठादार म्हणून सहभागी करून घेण्यात येणाऱ्या अडचणी कोणत्या? याची माहिती रेल्वे प्रशासनाने जाहीर करावी.

१,९२० कोचचे कंत्राट; प्रत्यक्ष उत्पादन कुठे?

किनेट रेल्वे सोल्युशन कंपनीकडे १,९२० रेल्वे कोच तयार करण्याचे कंत्राट असल्याचे सांगण्यात येते. करारानुसार २०२७ पर्यंत सर्व कोचचा पुरवठा अपेक्षित असताना प्रत्यक्ष उत्पादनाची सद्यस्थिती काय आहे? आतापर्यंत किती कोच तयार झाले? किती काम पूर्ण झाले? प्रकल्पाच्या कामाची अधिकृत प्रगती किती आहे? या प्रश्नांची उत्तरे रेल्वे प्रशासनाने द्यावीत. प्रत्यक्ष उत्पादन आणि अधिकृत नोंदी यांची स्वतंत्र पडताळणी करावी.

केवळ काम सुरू असल्याचे चित्र दाखवून जनतेच्या कररूपाने जमा झालेल्या पैशांचा वापर होत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही. कंत्राटातील अटींचे उल्लंघन झाले असल्यास संबंधित कंपनीला किती दंड किंवा पेनल्टी आकारण्यात आली, याची माहिती सार्वजनिक करावी. आवश्यक असल्यास कंत्राटी व्यवस्थेत नियमानुसार बदल करून भारतीय रेल्वेने स्वतः कारखान्याचे संचालन करावे किंवा सक्षम पर्यायी कंपनीची नियुक्ती करावी, अशी मागणीही संघर्ष समितीने केली आहे.

कोट्यवधींच्या कथित गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशी करा!

रेल कोच फॅक्टरीच्या कामकाजात आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे आरोप पुढे येत असून, यासंदर्भातील पुरावेही निवेदनासोबत जोडण्यात येणार असल्याचे समितीने स्पष्ट केले. निविदा प्रक्रिया, कंत्राटे, देयके, खर्च, निधीचा वापर आणि प्रत्यक्ष कामाची प्रगती यांची सक्षम व स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करावी. गैरव्यवहार सिद्ध झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी आणि चौकशीचा अहवाल जनतेसमोर मांडावा.

प्रशासनाने आता तरी उत्तर द्यावे!

मराठवाड्यातील बेरोजगारी, तरुणांचे स्थलांतर आणि स्थानिक उद्योगांची मर्यादित संधी या प्रश्नांवर उपाय म्हणून उभारण्यात आलेल्या रेल कोच फॅक्टरीबाबत आज स्थानिक तरुणांनाच प्रश्न विचारावे लागत आहेत. दोन वर्षांपासून निवेदने देऊनही कार्यवाही होत नसेल, तर प्रशासन नेमके कोणाच्या बाजूने उभे आहे? स्थानिक बेरोजगारांच्या प्रश्नांना न्याय देण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन आणि भारतीय रेल्वे प्रशासनाची नाही का?

या सर्व मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित रेल्वे अधिकारी, कंपनी व्यवस्थापन आणि कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन तातडीने कार्यवाही करावी. निवेदनावर झालेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल संघर्ष समितीला द्यावा. अन्यथा २३ नोव्हेंबरपासून मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील, असा ठाम इशारा विलास मुळे आणि मराठवाडा रेल कोच फॅक्टरी संघर्ष समितीने दिला आहे. ही लढाई कोणत्याही व्यक्ती किंवा कंपनीविरोधातील वैयक्तिक संघर्ष नाही; ही मराठवाड्यातील बेरोजगार तरुणांच्या हक्काची, स्थानिक कामगारांच्या न्यायाची, महिलांच्या सन्मानाची आणि जनतेच्या पैशांच्या हिशेबाची लढाई आहे. मराठवाड्याच्या मातीतील तरुणांना त्यांच्या हक्काचा रोजगार मिळालाच पाहिजे. स्थानिकांच्या हक्कांवर गदा येत असेल, तर आम्ही गप्प बसणार नाही. प्रशासनाने आमच्या मागण्यांची दखल घ्यावी; अन्यथा लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाच्या माध्यमातून हा लढा अधिक तीव्र केला जाईल,असा निर्धार संघर्ष समितीने व्यक्त केला.

आमरण उपोषण
- दिनांक :सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६
- वेळ : सकाळी ११ वाजता
- स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते, बेरोजगार तरुण, कामगार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विलास मुळे व मराठवाडा रेल कोच फॅक्टरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

धाराशिव खासदारांच्या पुढाकारातून ५ हजार तरुणांना रोजगाराची संधी; २४ नोव्हेंबर रोजी धाराशिव येथे बेरोजगारीला मिळणार मोठा आधार

औसा । बी.डी. उबाळे

लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेती आणि शेतीपूरक व्यवसायांसमोर अनेक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. अशा परिस्थितीत सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने धाराशिव येथे २४ नोव्हेंबर रोजी 'खासदार नौकरी महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणाऱ्या या मेळाव्यात सुमारे ८० नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, ५ हजारांहून अधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



या पत्रकार परिषदेला युवा हबचे संचालक दीपक पवारांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संतोष सोमवंशी म्हणाले की, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांत दुष्काळाची तीव्रता वाढत असून आगामी काळात परिस्थिती अधिक कठीण होण्याची शक्यता आहे. या संकटाचा परिणाम ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर आणि तरुणांच्या रोजगाराच्या संधींवरही होत आहे. त्यामुळे गावागावांतील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा, या हेतूने खासदार रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी विविध क्षेत्रांतील ८० हून अधिक नामांकित कंपन्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. कंपन्या आणि बँकांच्या माध्यमातून पाच हजारांहून अधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, मेळाव्यात पात्र आणि निवड झालेल्या उमेदवारांना जागेवरच नियुक्तीची संधी आणि नियुक्तिपत्रे दिली जाणार आहेत. मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक तरुणांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाइन नोंदणी करू न शकणाऱ्या उमेदवारांसाठी २४ नोव्हेंबर रोजी मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मात्र, तरुणांनी शक्यतो ऑनलाइन नोंदणी करूनच सहभागी व्हावे, असे आवाहन सोमवंशी यांनी केले.

या रोजगार मेळाव्यासाठी कोणत्याही प्रकारचे नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही. संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक आणि सुसूत्र पद्धतीने पार पाडण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. तसेच, मेळाव्यातून तातडीने नोकरीची संधी न मिळालेल्या उमेदवारांना भविष्यातील रोजगार संधींसाठी 'खासदार जॉब कार्ड' देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. दुष्काळी परिस्थितीमुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या ग्रामीण भागातील तरुणांसाठी हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिकाधिक बेरोजगार तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

उदगीर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दिनांक २३ नोव्हेंबर रोजी

उदगीर । पाटील मनेश

उदगीर तालुक्यातील एकूण ८७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे सन २०२५-२०३० या कालावधीसाठी आरक्षण निश्चित करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या राजपत्रात सुधारित अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. यापूर्वी प्रवर्गनिहाय आरक्षणाची संख्या ५० टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा अधिक निश्चित झाल्याने त्यामध्ये सुधारणा करून शासनाने अनुसूची-ब व अनुसूची-क अन्वये सुधारित आरक्षण संख्या निश्चित केली आहे. सुधारित अधिसूचनेनुसार उदगीर तालुक्यातील सरपंच पदांच्या आरक्षणाची प्रवर्गनिहाय संख्या पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती प्रवर्ग : एकूण २२ ग्रामपंचायतींपैकी ११ ग्रामपंचायती अनुसूचित जाती महिला व उर्वरित ११ ग्रामपंचायती अनुसूचित जाती (सर्वसाधारण) यांच्यासाठी निश्चित करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जमाती प्रवर्ग : एकूण २ ग्रामपंचायतींपैकी १ ग्रामपंचायत अनुसूचित जमाती महिला व १ ग्रामपंचायत अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) यांच्यासाठी निश्चित करण्यात आली आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) : उर्वरित ग्रामपंचायतींपैकी १९ ग्रामपंचायती नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आल्या आहेत. खुला प्रवर्ग : उर्वरित ४४ ग्रामपंचायती खुल्या प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाबाबत यापूर्वी काढण्यात आलेले आरक्षण जसेच्या तसे कायम ठेवण्यात येणार असून, या दोन्ही प्रवर्गांच्या आरक्षणामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीमध्ये संपर्क अधिकारी सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी उदगीर यांचे उपस्थितीमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग (नामाप्र) व त्यामधील महिला आरक्षण तसेच खुला प्रवर्ग व त्यामधील महिला आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे. सदर आरक्षण सोडतीची प्रक्रिया सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्व.मलशेट्टीआप्पा पाटील नागराळकर पंचायत समिती कार्यालय, उदगीर येथील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

सदर आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येणार असून, उदगीर तालुक्यातील सर्व ८७ ग्रामपंचायतींच्या नागरिकांनी या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास उपस्थित राहून आपली उपस्थिती नोंदवावी, असे आवाहन तहसीलदार राम बोरगावकर यांनी केले आहे. सदर कार्यक्रमाची माहिती सर्व संबंधित ग्रामपंचायतींमधील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत अधिसूचनेची प्रसिद्धी करण्यात आलेली आहे. तरी उदगीर तालुक्यातील सर्व नागरिकांनी दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्व. मलशेट्टीआप्पा पाटील नागराळकर पंचायत समिती सभागृह, उदगीर येथे आयोजित सरपंच पदांच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

राजवाडा निवास येथे कार्तिकी बारस निमित्त वारकरी स्नेहभोजन; आ.अमित देशमुख यांची उपस्थिती

लातूर । प्रतिनिधी

कार्तिकी बारस निमित्त लातूर तालुक्यातील वासनगाव येथील काँग्रेस कार्यकर्ते आप्पाराव कुंडलिकराव डुरे पाटील यांच्या राजवाडा निवास येथे वारकरी स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूरचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची पूजा करून दर्शन घेतले. यावेळी त्यांनी वारकरी बांधवांशी संवाद साधला वारकरी संप्रदाय ही



महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा असून, भक्ती, समता, एकता आणि सेवाभावाचा संदेश देणारी ही परंपरा समाजाला नेहमीच प्रेरणा देत असते. वारकरी बांधवांच्या सहवासातून मिळणारी ऊर्जा आणि विठ्ठलभक्तीचा अनुभव मनाला नवी उभारी देणारा आहे असे सांगीतले. कार्यक्रमास विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, अच्युत डुरे पाटील, हनमंत डुरे पाटील, अनंत डुरे पाटील, विठ्ठल डुरे पाटील, पंचायत समिती सदस्य अक्षय देशमुख, रमेश थोरमोटे पाटील, गोविंद डुरे पाटील, गोविंद देशमुख वारकरी मंडळी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जागतिक मधुमेह दिनानिमित्त अतनूर येथे आरोग्य जनजागृती सप्ताह कार्यक्रम उत्साहात

उदगीर । पाटील मनेश

येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, जन आरोग्य रुग्ण कल्याण समिती, जनक्रांती डोंगरी विकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (अतनूर), ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था समिती (महाराष्ट्र राज्य), तसेच साई हॉस्पिटल आणि उदयगिरी मल्टी स्पेशालिटी व अपघात हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१४ जागतिक मधुमेह दिनानिमित्त अतनूर येथे सप्ताहाचे भव्य जनजागृती व आरोग्य मार्गदर्शन सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

गेल्या एक वर्षापासून या संस्थांच्या माध्यमातून जळकोट तालुक्यातील अतनूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या २८ गावांतील ३२ हजार नागरिकांना आणि पंचायत समिती गणातील १७ गावे, वाडी, तांडा व अतिदुर्गम आदिवासी भागांतील लोकांना अखंडित आरोग्यसेवा व मार्गदर्शन शिबिरे दिली जात आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून २१ नोव्हेंबर रोजी शनिवारी सकाळी आरोग्य केंद्रात या विशेष सप्ताहाचा समारोप व मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला.

तज्ज्ञ डॉक्टरांचे बहुमूल्य मार्गदर्शन

या शिबिरामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जळकोट तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय पवार, साई हॉस्पिटलचे संस्थापक संचालक व प्रसिद्ध लॅप्रोस्कोपी सर्जन



तथा कोरोना काळातील 'आरोग्य देवदूत' डॉ. माधव चंबुले, प्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ डॉ. लक्ष्मण ढोकाडे आणि डॉ. रमन रेड्डी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख व डॉ. भक्ती कोल्हे यांनी ग्रामस्थांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख यांनी मधुमेह म्हणजे काय, त्याचे प्रकार, भारतातील मधुमेहाचे वाढते प्रमाण, प्राथमिक लक्षणे, निदान आणि आधुनिक उपचार पद्धती यावर सविस्तर प्रकाश टाकला. मधुमेहावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, गोड व तळलेल्या पदार्थांवर नियंत्रण आणि रक्तातील साखरेची वेळोवेळी तपासणी करणे किती आवश्यक आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत पटवून दिले. तसेच, मधुमेही रुग्णांनी कोणती फळे व किती प्रमाणात खावीत, याबाबतही मोलाचे आहारविषयक सल्ले दिले.

याप्रसंगी मान्यवरांनी ग्रामीण व डोंगरी भागातील आरोग्य सक्षमीकरणावर भर दिला. वैद्यकीय अधिकारी डॉ.सकलेन शेख यांनी मार्गदर्शनादरम्यान व तज्ज्ञांनी सांगितले की, मधुमेह हा आजार मुख्यत्वे बदलत्या जीवनशैलीशी निगडित आहे. कोणतीही लक्षणे अंगावर न काढता वेळेवर निदान आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित औषधोपचार घेतल्यास मधुमेह पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येतो. ग्रामीण व दुर्गम भागातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवणे, हेच या उपक्रमाचे मुख्य ध्येय आहे. उपस्थित मान्यवरांनी सर्व आयोजक संस्थांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही असेच लोकोपयोगी उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी संवादात्मक प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले, ज्यामध्ये ग्रामस्थांनी आपल्या आरोग्याविषयीच्या शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ५ उपकेंद्रांचे समुदाय आरोग्य अधिकारी, एएनएम, जीएनएम, मानसेवी आरोग्यमित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, जन आरोग्य रुग्ण कल्याण समितीचे अशासकीय सदस्य बी. जी. शिंदे, सर्व आरोग्य सेवक, अधिपरिचारिका, आरोग्य सहाय्यक, आशा कार्यकर्त्या व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या शिबिराला रुग्ण आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

५२ वर्षांच्या कीर्तनसेवेचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान!

शि.भ.प. महारुद्र मठपती (दैठणेकर) यांना प्रतिष्ठित जीवनगौरव पुरस्कार प्रदान; ११ शिवाचार्य महाराजांच्या हस्ते गौरव, धर्मप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलनातील योगदानाचा गौरव

लातूर । संतोष सोनवणे

कीर्तनाच्या माध्यमातून समाजमनावर संस्कार करत धर्म, संस्कृतीचे जतन, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजप्रबोधनाचा अखंड जागर गेल्या ५२ वर्षांपासून तेवत ठेवणारे ज्येष्ठ कीर्तनकार शि.भ.प. महारुद्र मठपती (दैठणेकर) यांना प्रतिष्ठित 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पुणे जिल्हा जंगम पुरोहित संस्थेच्या वतीने रविवार, १५ नोव्हेंबर रोजी पुण्यात आयोजित भव्य सोहळ्यात ११ शिवाचार्य महाराजांच्या शुभहस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्धशतकाहून अधिक काळ निःस्वार्थ भावनेने केलेल्या त्यांच्या धर्मसेवेचा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा हा गौरव ठरला.



कीर्तन ही केवळ मनोरंजनाची कला नसून समाजाला विचारांची दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे, याचा प्रत्यय महारुद्र मठपती यांच्या ५२ वर्षांच्या सेवाप्रवासातून येतो. लातूर शहरासह महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांत त्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता कीर्तनसेवा केली. धर्म आणि संस्कृतीच्या मूल्यांचे संवर्धन करताना त्यांनी आपल्या कीर्तनातून अंधश्रद्धा निर्मूलन, विवेकनिष्ठ विचार आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविला. पिढ्यान्पिढ्या समाजाला सन्मार्गाची प्रेरणा देणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थेने त्यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविले.

या सोहळ्याला वीरशैव लिंगायत धर्मातील ११ पूजनीय शिवाचार्य महाराजांची उपस्थिती लाभली. यामध्ये श्री.पु.ब्र. १०८ डॉ. नीलकंठ शिवाचार्य स्वामीजी (धारेश्वर), वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभेचे अध्यक्ष श्री.पु.ब्र. १०८ तपोरत्न नंदिकेश्वर शिवाचार्य स्वामीजी (सोनपेठ), कार्याध्यक्ष शिवाचार्य रत्न श्री.पु.ब्र. १०८ डॉ. शंभुलिंग शिवाचार्य स्वामीजी (उदगीर), सचिव श्री.पु.ब्र. १०८ डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य स्वामीजी (मुखेड), श्री.पु.ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य स्वामीजी (वाळवा), कोषाध्यक्ष श्री.पु.ब्र. १०८ महादेव शिवाचार्य स्वामीजी (वाई), प्रवक्ते श्री.पु.ब्र. १०८ दिगंबर शिवाचार्य स्वामीजी (वसमतकर), उपाध्यक्ष श्री.पु.ब्र. १०८ गुरुपादेश्वर शिवाचार्य स्वामीजी (गिरगाव), श्री.पु.ब्र. १०८ रविशंकार शिवाचार्य स्वामीजी (रायपाटण), श्री.पु.ब्र. १०८ सदाशिव शिवाचार्य स्वामीजी (वेळापूर) आणि श्री.पु.ब्र. १०८ शिव सोमनाथ शिवाचार्य स्वामीजी (करजगी) यांचा समावेश होता.

पुणे जिल्हा जंगम पुरोहित संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोमनाथ शास्त्री हिरेमठ, उपाध्यक्ष अक्षय मठपती, सचिव चंद्रकांत जंगम, खजिनदार सागर जंगम यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र आणि जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून महारुद्र मठपती यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी त्यांच्या हातून भविष्यातही धर्मसेवा, समाजप्रबोधन आणि लोकजागृतीचे कार्य अखंडपणे घडत राहावे, अशी प्रार्थना भगवान श्री शिवशंकराच्या चरणी करण्यात आली. ५२ वर्षांच्या निःस्वार्थ कीर्तनसेवेचा हा सन्मान त्यांच्या प्रदीर्घ कार्याचा गौरव करण्याबरोबरच समाजप्रबोधनाच्या कार्याला नवी प्रेरणा देणारा ठरला.

कृषीकुल येथे जलतारा प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

जलनायक मयंक गांधी व जलताराचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांची प्रमुख उपस्थिती; जलसंधारणासाठी लोकसहभागाचे आवाहन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

दुष्काळ ही केवळ संकटाची परिस्थिती नसून निसर्गाने मानवाला दिलेला आत्मपरीक्षण आणि सुधारणेचा संकेत आहे. भविष्यातील भीषण पाणीटंचाई टाळायची असेल, तर आजच जलसंधारणाची व्यापक लोकचळवळ उभी करून गावागावांत पाणी अडविण्याची आणि जमिनीत जिरविण्याची कामे हाती घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन जलतारा तंत्रज्ञानाचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी केले. तर, संकटाच्या या कठीण काळात शेतकरी आणि ग्रामस्थांनी खचून जाऊ नये. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून जलसंधारणासह ग्रामीण भागाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी विविध उपाययोजनांचा व्यापक रोडमॅप तयार करण्यात आला असून, मी केवळ संस्थेचा प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर तुमचा भाऊ म्हणून कायम तुमच्या सोबत असेन, अशी भावनिक ग्वाही जलनायक मयंक गांधी यांनी दिली. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर रोजी वक्षढ कृषीकुल येथे विशेष जलतारा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला जलनायक मयंक गांधी आणि जलतारा जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांची प्रमुख उपस्थिती



लाभली. परळी वैजनाथ, धारूर आणि अंबाजोगाई तालुक्यांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक तसेच जलसंधारणाची तळमळ असलेल्या नागरिकांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी जलतारा तंत्रज्ञानाची संकल्पना, त्याची कार्यपद्धती आणि भूजल पुनर्भरणातील महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कमी खर्चात, लोकसहभागातून आणि उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढविण्यासाठी जलतारा तंत्रज्ञान प्रभावी ठरू शकते. मात्र, कोणत्याही जलसंधारणाच्या कामाला लोकसहभागाची जोड मिळाली, तरच त्याचे दीर्घकालीन आणि शाश्वत परिणाम दिसून येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

जलनायक मयंक गांधी यांनी यावेळी दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित करताना सांगितले की, आज शेतकरी आणि ग्रामीण कुटुंबांसमोर मोठे संकट उभे आहे. मात्र, या संकटावर मात करण्यासाठी केवळ मदतीची वाट पाहण्याऐवजी गावागावांनी एकत्र येऊन पाण्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय शोधण्याची गरज आहे. ग्लोबल विकास ट्रस्ट जलसंधारण, नदी पुनरुज्जीवन, जलतारा, शेतकऱ्यांना आर्थिक आधार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करीत आहे. या संपूर्ण प्रवासात गावकरी आणि शेतकऱ्यांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

धर्माबादच्या सरकारी जमिनीचा घोळ! वारंवार मागणी करूनही माहिती नाही

अखेर सामाजिक कार्यकर्त्याचे २६ नोव्हेंबरला विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण; जिल्हा सहआयुक्तांचे तातडीने चौकशीचे आदेश

नांदेड । प्रतिनिधी

तक्रारकर्त्याने अनेकवेळा मागणी करूनही त्यांना माहिती देण्यात आली नसल्याने अखेर त्यांनी २६ नोव्हेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या संदर्भात त्यांचे उपोषण थांबवावे व त्यांनी मागितलेली माहिती देऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, असे जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपरिषद प्रशासन विभागाचे जिल्हा सहआयुक्त शैलेश फडसे यांनी उपविभागीय अधिकारी, धर्माबाद आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना कळविले आहे. बाळापूर ता. धर्माबाद जि. नांदेड येथील सर्व्हे क्र. ५९६/१/- या नगरपालिका धर्माबाद मालकीच्या जमिनीवरील अनियमित फेरफार नोंदी, बेकायदेशीर हस्तांतरण व महसूल अभिलेखातील गंभीर अनियमिततेची चौकशी करून संबंधित फेरफार रद्द करणे, जबाबदार अधिकारी / व्यक्तीवर कारवाई करणे व शासकीय जमिनीचे संरक्षण करणे बाबत. आपल्या पत्रानुसार आतापर्यंत काहीही कार्यवाही न केल्याबाबत दि.२६ नोव्हेंबर २०२६ रोजी आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत असल्याचे कळविले आहे.

अर्जदार शेख एजाज शेख बाबू यांनी बाळापूर येथील सर्व्हे क्र. ५९६/१/- या नगरपालिका धर्माबाद मालकीच्या जमिनीवरील अनियमित फेरफार नोंदी, बेकायदेशीर हस्तांतरण व महसूल अभिलेखातील गंभीर अनियमिततेची चौकशी करून संबंधित फेरफार रद्द करणे, जबाबदार अधिकारी / व्यक्तीवर कारवाई करणे व शासकीय जमिनीचे संरक्षण करणे बाबत मागणी केली होती. मात्र आपल्या पत्रानुसार आतापर्यंत कोणतीही कार्यवाही न केल्याने त्यांनी दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत असल्याचे कळविले आहे. त्यानुषंगाने सुलभ संदर्भासाठी निवेदनाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. तरी सदरील निवेदनात नमूद मागणीच्या अनुषंगाने तात्काळ सविस्तर चौकशी करून प्रकरणासंबंधी सर्व मा. न्यायालयाचे निर्णय / अधिनियम / नियम / अद्ययावत शासन निर्णयातील तरतुदी तपासून प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती अर्जदार यांना आपल्या स्तरावरून अवगत करून आमरण उपोषणापासून परावृत्त करावे व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, असे आदेश जिल्हा सहआयुक्त शैलेश खडसे यांनी दिले आहेत. आता प्रशासन या प्रकरणात वेळेत कारवाई करून उपोषण टाळते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आ.अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून खर्डेकर कॉम्प्लेक्स ते श्री अवधूत यांच्या घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

जालना । प्रतिनिधी

आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून खर्डेकर कॉम्प्लेक्स ते श्री अवधूत यांच्या घरापर्यंत होणाऱ्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते विधिवत भूमिपूजन करण्यात आले. या रस्त्याच्या कामामुळे परिसरातील नागरिकांची अनेक दिवसांपासूनची रस्त्याची समस्या दूर होण्यास मदत होणार असून नागरिकांना ये-जा करण्यासाठी अधिक चांगली आणि



सुविधाजनक रस्त्याची व्यवस्था उपलब्ध होणार आहे. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना होणारा त्रास कमी होऊन परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होण्यास या रस्त्याचा फायदा होणार आहे.

आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून आमदार स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून परिसरातील विकासकामांना चालना मिळत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शहराच्या विविध भागांतील मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे यावेळी आमदार खोतकर यांच्या विकासकामांतून अधोरेखित झाले. पायाला दुखापत असतानाही जनतेच्या सेवेसाठी आमदार अर्जुनराव खोतकर कार्यमग्न; भास्कर आंबेकर यांच्याकडून कौतुक

यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या कार्यतत्परतेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले की, आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या पायाला दुखापत झालेली असतानाही ते आपला त्रास बाजूला ठेवून सामान्य नागरिकांच्या भेटीला जात आहेत. जनतेच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने कार्यमग्न असतात. आम्ही साहेबांना

पान २ वर

आ.धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळीत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आज दिवाळी स्नेह मिलनाचे आयोजन

दिवाळी स्नेह मिलना कार्यक्रमास व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : सभापती सूर्यभान नाना मुंडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या आयुष्यात पोहोचावा, सणाच्या निमित्ताने आपुलकीची नाती अधिक दृढ व्हावीत आणि व्यापारी बांधवांमध्ये स्नेह, जिव्हाळा व परस्पर संवाद वाढावा, या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समिती, परळी वैजनाथ यांच्या वतीने आडते व विविध व्यापारी बांधवांसाठी सोमवार, दि.२३ नोव्हेंबर रोजी दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी मंत्री तथा आमदार मा. धनंजयजी मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा स्नेहमिलन पार पडणार आहे. तरी दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमास व्यापारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सभापती



सूर्यभान नाना मुंडे यांनी केले आहे.

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण आहे. यंदा दुष्काळाच्या सावटाखाली दिवाळी साजरी होत असली तरी समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण व्हावेत, व्यापारी बांधवांनी एकत्र येऊन स्नेहाचे नाते अधिक घट्ट करावे, या भावनेतून बाजार समितीने या स्नेह मिलनाचे आयोजन केले आहे. दिवाळीचा गोडवा, आपुलकीच्या गप्पा आणि स्नेहभोजनाच्या माध्यमातून सर्वांना एकत्र आणण्याचा हा उपक्रम आहे.

या कार्यक्रमास परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व आडते, व्यापारी बांधव आणि संबंधित घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बाजार समितीचे सभापती सूर्यभान (नाना) मुंडे यांनी केले आहे. व्यापारी बांधवांच्या उपस्थितीने या स्नेह मिलनाची शोभा वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. हा कार्यक्रम सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता भागवत मंगल कार्यालय, परळी वैजनाथ येथे होणार असून, यानिमित्त स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्नेहभोजनासह दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रमाला सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन सभापती सूर्यभान नाना मुंडे, सचिव बी. आर. रामदासी व सर्व संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

कै. भाऊसाहेब नरहरराव देशमुख (बप्पा) यांना अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

परळी । प्रतिनिधी

वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव राजेशजी देशमुख मालक तसेच डॉ. दुशंत



देशमुख यांचे वडील कै. भाऊसाहेब नरहरराव देशमुख (बप्पा) यांच्या निधनाने परळीतील एक मनमिळाऊ, दिलदार आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या निधनाने देशमुख कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कै. बप्पा यांना अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे व सुभाष शेप यांच्या उपस्थितीत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे म्हणाले की, कै. बप्पा यांचा स्वभाव अतिशय गोड, सोज्वळ आणि मनमोकळा होता. प्रत्येकाशी आपुलकीने वागणारे, सर्वांना सोबत घेऊन चालणारे आणि आपल्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वाने सर्वांच्या मनात आदराचे स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे बप्पा होते. त्यांच्या जाण्याने परळीच्या सामाजिक जीवनातील एक आपुलकीचा माणूस हरपला आहे. त्यांच्या आठवणी सदैव सर्वांच्या मनात जिवंत राहतील. अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने कै. भाऊसाहेब नरहरराव देशमुख (बप्पा) यांना विनम्र अभिवादन करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कामगारांसाठी १८ योजनांची माहिती एकाच ठिकाणी शिक्षण आरोग्यापासून ते मृत्यू व अपंगत्व सहाय्यापर्यंत आर्थिक मदतीची तरतूद

योजनांची माहिती तळागाळातील कामगारांपर्यंत पोहोचवण्याची गरज : जमीर शेख

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजनांची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध करून दिली असून, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून एकूण १८ योजनांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कामगारांच्या मुलांचे शिक्षण वैद्यकीय उपचार कौशल्य प्रशिक्षण क्रीडा साहित्य प्रकाशन तसेच बांधकाम कामगारांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक सहाय्य अशा विविध बाबींचा समावेश आहे. शासनाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या १०



आणि बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ८ अशा एकूण १८ योजनांची माहिती देण्यात आली आहे.

शिक्षणासाठी हजारो रुपयांचे अर्थसहाय्य

बांधकाम कामगारांच्या मुलांनी शिक्षणात प्रगती करावी यासाठी नववी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना २० हजार रुपये अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना २५ हजार रुपये वैद्यकीय पदवी शिक्षणासाठी १ लाख रुपये, तर इंजिनिअरिंग पदवी शिक्षणासाठी ६० हजार रुपयांच्या आर्थिक सहाय्याची तरतूद आहे. या योजनांमध्ये पहिल्या दोन मुलांसाठी पात्रतेनुसार लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मृत्यू व अपंगत्वाच्या प्रसंगी कुटुंबाला आधार

बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसांना ३ लाख ५० हजार रुपये तर अपघाती मृत्यू झाल्यास ६ लाख ५० हजार रुपये आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद आहे. तसेच किमान ७५ टक्के अपंगत्व आल्यास २ लाख रुपयांची मदत मिळू शकते. महिला बांधकाम कामगारांना पहिल्या दोन अपत्यांच्या प्रसूतीसाठी २५ हजार रुपयांच्या सहाय्याची तरतूदही करण्यात आली आहे. गंभीर आजारावरील

पान २ वर

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे मंगळवार रोजी कल्याण महाराज काळे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत किसनबाबा यांच्या



२९ व्या वर्षातील तिसऱ्या पुण्यतिथी कार्तिक शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे शिवशाहीर ह.भ.प. कल्याण महाराज काळे भातकुडगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांचे मंगळवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी मौज ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

कपिलधारच्या भूमीत शिवा संघटनेचा यल्गार!

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, पंकजाताई मुंडे, धनंजय मुंडे एकाच व्यासपीठावर

श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामींच्या संजीवन समाधीची २५ वी शासकीय महापूजा : प्रा. मनोहर धोंडे यांची माहिती

अणदूर । सचिन तोग्गी

वीरशैव-लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपिलधार, ता. जि. बीड येथे कार्तिक शुद्ध पौर्णिमेनिमित्त शिवा-अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येणारा ३१ वा राज्यव्यापी वार्षिक मेळावा आणि श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीची २५ वी शासकीय महापूजा मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या सोहळ्यास राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्यासह राज्यातील अनेक मंत्री, माजी मंत्री, लोकप्रतिनिधी, शिवाचार्य, धर्मगुरू आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी दिली.

शिवा संघटनेच्या स्थापनेपासून म्हणजेच सन १९९६ पासून दरवर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने श्री क्षेत्र कपिलधार येथे राज्यव्यापी वार्षिक मेळाव्याचे आयोजन केले जाते. यंदा या मेळाव्याचे ३१ वे वर्ष असून, त्याचबरोबर श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीची २५ वी शासकीय महापूजा पार पडणार आहे. वीरशैव-लिंगायत समाजाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्याचे प्रतीक बनलेला हा मेळावा दरवर्षी हजारो समाजबांधवांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा केला जातो.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

या राज्यव्यापी मेळाव्याला पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री धनंजय भाऊ मुंडे, जयदत्त आण्णा क्षीरसागर, सुरेश आण्णा नवले, आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्यासह राज्यातील अनेक राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. याशिवाय अनेक शिवाचार्य, धर्मगुरू तसेच शिवा संघटनेचे राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकारी या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्याचे अध्यक्षस्थान आणि उद्घाटन शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे भूषविणार आहेत. या प्रसंगी वीरशैव-लिंगायत समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांना 'शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन या मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. त्यामुळे यंदाच्या मेळाव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

महापूजेची परंपरा २००२ पासून सुरू

श्री क्षेत्र कपिलधार येथे वीरशैव संत श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीची शासकीय महापूजा करण्याची परंपरा सन २००२ पासून सुरू झाली. शिवा संघटनेच्या सातत्यपूर्ण मागणीनुसार आणि लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या आग्रहावरून तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांनी या शासकीय महापूजेला प्रारंभ केला. पंढरपूरच्या धर्तीवर कपिलधार येथेही शासनाच्या वतीने महापूजा व्हावी, ही वीरशैव-लिंगायत समाजाची अनेक वर्षांची मागणी होती.

त्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि. ६

पान २ वर

पालम शहरातील जागोजागी अतिक्रमणाचा विळखा; नगरपंचायत कुंभकर्ण झोपेत

पालम । अनिस खुरेशी

शहरातील मुख्य पाईपलाईन आणि सार्वजनिक नालीवर मोठ्या



प्रमाणावर झालेल्या अवैध अतिक्रमणामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा तुटवडा व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी ॲड. मगदूम गफार कुरेशी आणि परिसरातील नागरिक, लाभार्थ्यांच्या वतीने नगरपंचायत प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, अतिक्रमण तात्काळ न हटवल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.


पालम शहरातील परभणी रोड ते शासकीय धान्य गोदामाकडे जाणाऱ्या जुन्या कोळवाडी रोडवरील नगर पंचायतीच्या मुख्य पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनवर आणि सार्वजनिक नालीवर काही लोकांनी बेकायदेशीर पक्के बांधकाम व अतिक्रमण केले आहे. दूषित पाणी आणि रोगराईचा धोका: या अतिक्रमणामुळे पाईपलाईनची दुरुस्ती करणे अशक्य झाले असून पाण्याचा दाब कमी झाला आहे. तसेच नाल्यांचा निचरा बंद झाल्याने सांडपाणी लोकांच्या घरात शिरत असून शहरात रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. पाईपलाईनवरील सर्व अतिक्रमण ७ दिवसांच्या आत मोजणी करून काढून टाकावे. पाईप लाईनच्या दोन्ही बाजूंना जागा पूर्णपणे मोकळी करावी अशी मागणी ॲड. मगदूम कुरेशी, रामप्रसाद कदम, ॲड. बी.डी. गोरे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलच्या बीड जिल्हाध्यक्षपदी उमेश गायकवाड यांची निवड!

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र राज्य ओबीसी सेलच्या बीड जिल्हाध्यक्षपदी उमेश गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बीड येथील संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालयात पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी राज्य प्रवक्ते प्रा. शिवराज बांगर, ग्रामपंचायत सदस्य शरदराव घोलप यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार शशिकांत शिंदे साहेब आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष श्री. राजाभाऊ राजापुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत



प्रदेश कार्यालयात उमेश गायकवाड यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज बुलंद करणे, समाजातील विविध घटकांना संघटित करणे, त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पुरोगामी विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविणे, ही महत्त्वपूर्ण जबाबदारी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष उमेश गायकवाड यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या संघटनात्मक कार्यक्षमतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा उपयोग पक्षवाढीसह ओबीसी समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी निश्चितच होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उमेश गायकवाड यांच्या निवडीमुळे बीड जिल्ह्यात पक्षाच्या ओबीसी सेलला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

आई लक्ष्मीबाई जनार्धन मुंडे यांचा ७५ वा अमृत महोत्सव सोहळा २३ नोव्हेंबरला टोकवाडीत; ह.भ.प. सोपान महाराज सानप यांच्या कीर्तनाचे आयोजन

आईचे पूजन, तुलादान मिरवणूक आणि महाप्रसादाचेही आयोजन; भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे मुंडे परिवाराचे आवाहन

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील टोकवाडी येथे लक्ष्मीबाई जनार्धन मुंडे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त सोमवार, दि.२३ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यानिमित्त आईचे पूजन, तुलादान मिरवणूक, ह.भ.प. सोपान महाराज सानप (शास्त्री), हिंगोली यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड येथे पार पडणार आहे.

कीर्तनातून होणार भक्तिरसाची पर्वणी

या अमृत महोत्सव सोहळ्यात ह.भ.प.सोपान महाराज सानप (शास्त्री), हिंगोली यांचा कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आपल्या कीर्तनातून ते उपस्थित



भाविकांना अध्यात्मिक विचार, भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणार आहेत. या कीर्तनाचा लाभ परिसरातील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आईचे पूजन व तुलादान मिरवणूक

आई लक्ष्मीबाई जनार्धन मुंडे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त आईचे पूजन व तुलादान मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. कुटुंबीयांच्या प्रेम, आदर आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारा हा सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे.

संत-महंतांचे शुभाशीर्वाद व मार्गदर्शन

या सोहळ्यास ह.भ.प. चैतन्य सद्गुरू गोपाळ महाराज वासकर (आण्णा) यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत. तसेच मार्गदर्शक म्हणून ह.भ.प.डॉ. तुकाराम महाराज मुंडे (शास्त्री) आणि ह.भ.प. जगदीश महाराज सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

मुंडे परिवाराच्या वतीने निमंत्रण

या अमृत महोत्सव सोहळ्याचे निमंत्रक म्हणून महादेव जनार्धन मुंडे, शिवाजी जनार्धन मुंडे, संभाजी जनार्धन मुंडे आणि डॉ. भरत जनार्धन मुंडे यांनी सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ, भाविक व परिसरातील नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

महाप्रसादाचे आयोजन

कार्यक्रमानंतर दुपारी २ ते ५ या वेळेत भोजन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी कार्यक्रमास व भोजनास उपस्थित राहून या आनंद सोहळ्यात सहभागी व्हावे, अशी नम्र विनंती मुंडे परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे स्थळ : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. संपर्क : ९८२२८३२५८७ / ९२८४९६७५८१ आईच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने भक्ती, संस्कार, कुटुंबीयांचे प्रेम आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा हा सोहळा टोकवाडी परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे.